## प्रकरण दुसरे

# धर्म व पंथ

| अ. क्र | घटक |
|---|---|
| **२.१** | **हिंदू धर्म** |
| | **२.१.१ वारकरी संप्रदाय** |
| | २.१.२ दिंडी |
| | २.१.३ माघवारी पालखी प्रस्थान व रिंगण सोहळा |
| | २.१.४ सोलापूर शहरातील संत परंपरा |
| **२.२** | **वीरशैव (लिंगायत) संप्रदाय** |
| | २.२.१ महात्मा बसवेश्वर व अनुभव मंटप |
| | २.२.२ अल्लमप्रभु |
| | २.२.३ श्री सिध्दरामेश्वर |
| | २.२.४ वीरशैव पंथाचे आचार व तत्त्वज्ञान |
| | २.२.५ दासोह |
| | २.२.६ मठ |
| | २.२.७ वीरशैव पंथाचे कार्य |
| **२.३** | **दत्त संप्रदाय** |
| **२.४** | **नाथ संप्रदाय** |
| **२.५** | **नागेश संप्रदाय** |
| **२.६** | **इस्लाम धर्म** |
| **२.७** | **जैन धर्म** |
| | २.७.१ पंचव्रत व णमोकार मंत्र |
| | २.७.२ सोलापूर शहरातील जैन धर्म |
| | २.७.३ सल्लेखना व विविध संस्कार |
| **२.८** | **बौध्द धर्म** |

| | |
|---|---|
| २.९ | **पारशी धर्म** |
| २.१० | **ख्रिश्चन धर्म** |
| २.११ | **शिख धर्म** |

## प्रकरण - दुसरे

# धर्म व पंथ

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांच्या सीमेवर असल्याने येथे विविध संस्कृतीचे लोक राहतात. मराठी, तेलगू, कानडी व उर्दू भाषा याठिकाणी बोलल्या जाताता.[१] त्यामुळे विविध भाषा बोलणाऱ्या भिन्नभिन्न संस्कृतींचा मिलाफ येथे पाहावयास मिळतो. ब्रिटीशपूर्व व ब्रिटिश काळात व्यवसायाच्या निमित्ताने आलेल्या मुस्लिम बांधवाचेही वास्तव्य शहरात मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे सोलापूर शहराच्या धार्मिक इतिहासात भाषा, व संस्कृतीने महत्वाचे योगदान दिले आहे.

सांस्कृतिक जीवनाचा एक महत्वाचा घटक म्हणून धर्माला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.[२] धर्म या संकल्पनेला मानवी संस्कृतीच्या इतिहासात सातत्याने महत्त्व दिले गेल्याचे दिसून येते. 'धृ' म्हणजे धारण करणे 'धृ' या धातूपासून धर्म हा शब्द बनला आहे. काळानुसार धर्माच्या अनेक व्याख्या अस्तित्वात आल्या. ऋग्वेदामध्ये 'धृ' या धातूचा अर्थ आधार देणे, पोषण करणे, उचलून धरणे किंवा टिकविणे असा आहे.[३] समाजाचे चांगल्या रीतीने धारण करणारी वागणूक म्हणजे धर्म होय.[४] धर्म हा मानवाचा सर्वत्र सारखाच असतो असे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे मत आहे.[५] ज. वा. जोशी म्हणतात, 'प्रत्येक व्यक्तीमध्ये असणाऱ्या सुप्त ईश्वरी शक्तीला व चैतन्य शक्तीला खऱ्या अर्थाने 'धर्म' प्रतिष्ठा देतो'.[६] समाजाची उन्नती हे धर्माचे साध्य आहे तर धर्म हे साधन आहे. ज्यामुळे समाजाचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष होतो, ते नितीनियम म्हणजे धर्म होय.[७] धर्म आणि मानव यांचे परस्पर संबंध असल्याचे आणि धर्म ही मानवाची सर्वोच्च गरज असल्याचे डॉ. शर्मा यांनी म्हटले आहे.[८] निसर्गातील अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबंध, जीवन व विश्व अथवा निसर्ग अशा अलौकिक शक्तीवर माणसाची श्रध्दा असते. त्या शक्तीचा स्वतःचा अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी, वैयक्तिक अथवा सामाजिक मनप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पध्दती म्हणजे 'धर्म' होय.[९]

महात्मा जोतीबा फुल्यांनी धर्माचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की, 'सत्य ज्याचे कर्म तोच धर्म. धर्म हे संस्कृतीचे सर्वात श्रेष्ठ अंग होय.[१०] राजर्षी छत्रपती शाहू धर्माबद्दल म्हणतात की, देशबंधूची सेवा, परोपकार आणि जनता जनार्दन शोधणे म्हणजे खरा धर्म होय.[११] उदात्त कृत्ये

करण्यासाठी सतत प्रवृत्त असणे म्हणजे धर्म होय, असे स्वामी विवेकानंद म्हणतात.[१२] संत गाडगेबाबांच्या मते ' धर्म सांगायचा नसतो, जगायचा असतो, धर्म ग्रंथात नसतो, जीवनात असतो. ' धर्माचे सार सांगाताना ते म्हणतात की, भूकेल्या जीवाला अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, विवस्त्रांना वस्त्र द्या, बेघरांना आसरा द्या, रोग्यांवर औषधोपचार करा, मुक्या प्राण्यावर दया करा, कष्ट केल्याशिवाय भाकरी खाऊ नका, हाच खरा रांगडा धर्म होय.[१३] ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म अशी टिळकांनी केलेली धर्माची व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही मान्य आहे.[१४]

धर्माचा संबंध हा पवित्र वस्तुंशी असून, धर्माबद्दल आचरणाचे नियम म्हणजे धर्म होय अशी डरखीमची कल्पना होती.[१५] धर्म म्हणजे मानवाची उच्चतम शक्तीबाबतची श्रध्दा होय. या श्रध्देचा अविष्कार, प्रार्थना, भक्ती, सेवा या स्वरूपात होतो तर जीवनव्यापी विश्वनियंत्रक दिव्य तत्त्वाची आराधना म्हणजे धर्म होय.[१६] धर्म भावनेच्या बुडाशी सामाजिकता असते असे मत दुर्गा भागवत यांनी व्यक्त केले आहे.[१७] धर्म म्हणजे समाजाची रचना टिकविण्यासाठी आलेले परंपरागत नियम होय.[१८] धर्म म्हणजे व्रतवैकल्ये, तिर्थयात्रा, भजन पुजन हे नसून यवनांचे पारिपत्य, म्लेच्छांचा उच्छेद आणि स्वराज्याची स्थापना, धर्म म्हणजे समाजाच्या परंपरेचे वैभवाचे रक्षण, लोकांचा उत्कर्ष, मरगळलेल्या मनाला चैतन्य निर्माण करणे, समाजाची आत्मश्रध्दा जागी करणे आणि लोकांना पराक्रमाची विश्वविजयाची प्रेरणा देणे होय.[१९] मनुस्मृतीवरील आपल्या टिकेमध्ये मेघातिथीने वर्णधर्म, आश्रमधर्म, नैमित्तिक धर्म, गुणधर्म अशा प्रकारच्या धर्माचा उल्लेख केला आहे.[२०] तर समर्थ रामदासांनी क्षात्रधर्म, ब्राम्हण धर्म, सेवक धर्म असे भिन्नभिन्न धर्म सांगितले आहेत.

धर्म हे धारण करणारे, जोडणारे, गुंफून ठेवणारे, बांधणारे सूत्र असून हे सूत्र संपूर्ण समाजात सामंजस्य निर्माण करते. धर्माचा संबंध धारणेशी म्हणजे ज्या गुणामुळे, शक्तीमुळे, भावनेमुळे अथवा नियमांमुळे, व्यवस्थेमुळे वस्तूंची धारणा होते, त्याला धर्म म्हणतात.[२१]

हिंदू, बौद्ध, जैन, यहूदी, ख्रिस्त, इस्लाम असे अनेक धर्म अस्तित्त्वात आहेत. या प्रत्येक धर्माची स्वतःची अशी आचारसंहिता तयार झालेली आहे. या आचारसंहितेद्वारे प्रत्येक धर्मसंप्रदायाचे धार्मिक दृष्टीकोन, श्रध्दा, मूलप्रणाली प्रकट होते. या सर्वांमुळे मानवी जीवनाचे नियंत्रण व व्यवस्थापन होते.[२२] वर उल्लेख केलेल्या धर्मातील अनेक पंथ उपपंथाची धार्मिक स्थळे[२३] सोलापूर शहरात दिसून येतात.

## २.१ हिंदू धर्म

हा धर्म वैदिक परंपरेतून विकसित झालेला दिसतो, त्यालाच वैदिक, आर्य, वर्णाश्रम किंवा हिंदू धर्म[२४] या नावाने ओळखले जाते. हिंदू धर्मामध्ये अनेक संप्रदाय, पंथ, उपपंथ, धर्मश्रध्दा व सिध्दांत आढळतात. मूर्तीपूजा व यज्ञपुजा, पाठ हा हिंदू धर्मातील महत्त्वाचा भाग असून कुलदेवता, इष्टदेवता इत्यादींचे पुजन हा नित्य आचार धर्माचा भाग मानण्यात येतो. मंदिरांची रचना, मूर्तीची प्रतिष्ठापना, उपासना, सण, उत्सव, दान, व्रत्त-वैकल्ये, तिर्थयात्रा हा हिंदू धर्माचा सामाजिक आविष्कार आहे.[२५] हिंदू धर्मात शैव, वैष्णव, शाक्त, नाथ, महानुभाव, वीरशैव (लिंगायत) असे अनेक संप्रदाय उदयास आले.

सोलापूर शहरातील औद्योगिक प्रगतीनंतर गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि उत्तरेतून उदरनिर्वाहासाठी आलेले लोक या शहरातच स्थायिक झाले.[२६] महाराष्ट्रातील वारकरी पंथाचा प्रभाव अशा या लोकांवर पडल्याशिवाय राहिला नाही.[२७]

### २.१.१ वारकरी संप्रदाय

हिंदू धर्मात असलेल्या अनेक भक्ती संप्रदायापैकी वारकरी संप्रदाय हा प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखला जातो. पंढरपूरचा 'विठ्ठल' हे या संप्रदायाचे उपास्यदैवत आहे.[२८] महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडू मधील कानाकोपऱ्यात या संप्रदायाचा प्रसार झाला आहे. वारकरी संप्रदायामध्ये एखाद्या व्यक्तीने गळयात तुळशीची माळ घालून वारीचे व्रत स्वीकारले, तर त्यांच्या नंतरच्या पिढ्या हे व्रत सांभाळताना आपणास दिसतात.[२९] महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या तीन प्रांतात भाषाभिन्नता असूनही पंढरपूरचा 'विठ्ठल' या तिनही संस्कृत्यांच्या एकात्मकतेचे प्रतिक असल्याचे दुर्गा भागवत म्हणतात.[३०] वारकरी संप्रदाय म्हणजेच भागवत धर्म होय.[३१]

सोलापूर शहरात विठ्ठल भक्तीची अनेक ठिकाणे आहेत. त्यामध्ये जुने विठ्ठल मंदिर, स्वकुळ साळी समाज विठ्ठल मंदिर, सिध्देश्वर मंदिर परिसरातील विठ्ठल मंदिर, क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर, राधाकृष्ण विठ्ठल मंदिर (काशी कापडी), काकडे विठ्ठल मंदिर, भडंगे विठ्ठल मंदिर, नामदेव समाज विठ्ठल मंदिर, लष्कर विठ्ठल मंदिर त्याचबरोबर विविध मठांचाही समावेश होतो.[३२] सोलापूर शहरात कापड गिरण्यात काम करणारा कामगार वर्ग हा या मंदिर व मठांच्या माध्यमातून या संप्रदायाकडे आकर्षित झाला.[३३]

" वारी " करणारा तो वारकरी होय. ज्ञानदेव व नामदेव यांच्या अभंगातून ' वारीकर ' असा शब्द आला आहे. त्याचेच ' वारकरी ' असे रूप झाले आहे. आले रे आले हरिचे डिंगर। वीर वारीकर पंढरीचे ।।[३४] असे वारीसंदर्भात म्हटले जाते.' वारीकर ' हा निष्ठेने पंढरीची वारी करतो. महाराष्ट्रात जेजूरी, गाणगापूर इत्यादी ठिकाणी नियमितपणे जाणारे लोक आहेत. परंतु त्यांना वारकरी असे म्हटले जात नाही.[३५] राजवाडे यांनी "वारी" या शब्दाशी उत्पत्ती दिली. वारिः - री (प्रवाशांची टोळी) = वारी, पंढरीची वारी म्हणजे पंढरीला जाणाऱ्या प्रवाशांची टोळी. वारकरी म्हणजे वारीला जाणारा प्रवाशी.[३६] अमरकोशात 'वार' या शब्दाचा अर्थ 'समुदाय' अगर संघात असा दिला आहे. यावरून वारकरी म्हणजे वारी करणारा समुदाय होय. ज्ञानेश्वरीत 'वारी' हा शब्द 'फेरा' अगर 'खेप' या अर्थाने आला आहे.[३७] मोल्सवर्थ या शब्दकोशामध्ये 'वारी' शब्दाचा अर्थ "The practice of proceeding regularly at recrning monthly or annual periods on pilgrimage to any sacred place" असा आहे.[३८] प्रतिवर्षी अगर प्रत्येक महिन्याला नियमितपणे पवित्र स्थळांच्या यात्रेस जाण्याची प्रथा म्हणजे 'वारी' होय.

वारकऱ्यांच्या उपासनेचा मार्ग म्हणजे 'वारकरी पंथ' होय.[३९] वारी ही दोन प्रकारची मानली जाते, पंढरीची वारी ही प्रत्येक एकादशीस असते तर दुसऱ्या प्रकारची वारी कार्तिकी एकादशी ही आळंदीची वारी म्हणून प्रसिध्द आहे. या वारीस सोलापूरातून हजारो वारकरी आळंदीस जातात आणि आळंदीहून निघणाऱ्या ज्ञानेश्वराच्या पालखीबरोबर पायी चालत पंढरपूरास येतात म्हणून या वारीस 'आळंदीची वारी' या नावाने ओळखले जाते. यामध्ये पुरूषांबरोबर शहरातील महिला वारकऱ्यांचाही समावेश असतो.[४०] वारकरी पंथाची दीक्षा घेताना लोक गुरूकडून तुळशीची माळ आपल्या गळयात घालतात. गळयात तुळशीची माळ, कपाळास गोपीचंदनाचा टिळा, बुक्का व खांद्यावर भगवी पताका ही वारकऱ्यांची बाह्यलक्षणे आहेत.[४१]

वारकरी संप्रदायाच्या उपासनेचे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे भजन आणि कीर्तन.[४२] भक्तीसुख साधण्याचा मार्ग म्हणजे भजन होय.[४३] भजन हे भक्तीगीत विविध साधनांच्या सहाय्याने गायले जाते. त्यामध्ये टाळ, वीणा, चिपळया या साहित्यांचा समावेश होतो. सर्वसामान्य माणसे भजन गाण्यासाठी एखाद्या मंदिरात एकत्र येतात.[४४] भजन हे मानवी मनाला समाधान देणारे वीणा, टाळ-मृदंगाच्या घोषातील ब्रह्मरस मानले जाते.[४५]

भजनाबरोबरच वारकरी सांप्रदायात नामस्मरणाला व किर्तनालाही तितकेच महत्त्व आहे. नामस्मरण हे नामसंकीर्तन आहे.[४६] वारकरी सांप्रदायात किर्तनाला 'निरूपण' असेही म्हणतात. वारकरी कीर्तन व हरिदासी कीर्तन हे कीर्तनाचे दोन प्रकार आहेत[४७] तर नामस्मरण हे परमात्मा प्रेमाच्या उदयाचे व विकासाचे एकमेव साधन आहे. नामस्मरणात 'स्मरण' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. नामाचाच विस्तार म्हणजे भजन, कीर्तन व वारी होय.[४८] विठ्ठलाच्या नामस्मरणासाठी जाती-पातीचे बंधन नसते. देवापुढे सर्व समान आहेत, सर्वांना ईश्वर भक्तीचा अधिकार आहे.[४९] या विचाराने सोलापूर शहरात या संप्रदायाचे कार्य चालते. शहरात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अनेक किर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक मंडळी होऊन गेली. त्यांनी चालविलेला या संप्रदायाचा वारसा नंतरच्या वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर जपून ठेवला आहे. ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज यांनी 'मुक्ताई वारकरी शिक्षण संस्था' स्थापन करून किर्तनकार व प्रवचनकार निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे.[५०]

किर्तनाबरोबरच वारकरी संप्रदायात भारूडाला अत्यंत महत्त्व आहे. भारूड रचना हे नाथांचे खास वैशिष्ट्य असून नीती व धर्म यांच्या लोकशिक्षणाचे अत्यंत प्रभावी साधन म्हणून नाथांनी ते कुशलतेने वापरले आहे. भारूडातून समाज प्रबोधनाचे कार्य अत्यंत कुशलतेने होते.[५१] शहरातील विविध वारकरी मंडळी भजन व किर्तनाच्या जोडीला भारूडाच्या कार्यक्रमाचे आयोजन करतात. भारूडाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती, वाईट चालीरिती इत्यादीं विषयी प्रबोधन केले जाते. भारूडकारामध्ये देविदास जगताप, नागनाथ पाटील, बजरंग डांगे, गार्गीताई काळे, सरस्वती आगलावे इत्यादी पुरूष व महिलांचा त्यात समावेश होतो.

### २.१.२ दिंडी

'दिंडी' या शब्दाचे लहान दरवाजा व पताका असे दोन अर्थ आहेत. भजनी मंडळातील एक व्यक्ती दिंडी नावाचे एक वाद्य (वीणा) वाजवित पुढे जातो व बाकी त्याच्या मागोमाग जातात म्हणून त्या मंडळाला 'दिंडी' असे म्हणतात. दिंडीतील वारकरी दोन रांगा करून समोरासमोर उभे राहतात आणि दिंडी (वीणा) व मृदंग वाजविणारे त्या रांगाच्या बाजूला टाळ घेऊन उभे असतात. टाळ व मृदंग यांच्या साथीवर तोंडाने भजन म्हणत व मागे-पुढे पावले टाकीत ते हळुहळू मार्गक्रमित असतात. मधून-मधून 'विठ्ठल' नामाचा गजरही होतो. हा नाच साधा पण प्रेक्षणिय असतो. दिंड्यामधून

पुरूषांच्या बरोबरीने वारकरी स्त्रियाही सहभागी होतात. हे सर्व वारकरी भजन करीत नाचत पंढरपूरास जातात. वारकरी संप्रदायाच्याद्वारे सोलापूर शहरातून व परिसरातून अनेक दिंड्या पंढरपूरास विठ्ठलाच्या भक्तीच्या ओढीने जातात. पंढरपूरास येणाऱ्या दिंड्या या मोठ्या प्रमाणावर आषाढी, कार्तिकी आणि चैत्री एकादशीस येतात. परंतु सोलापूर शहराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माघवारीस मोठ्या प्रमाणावर दिंड्या पंढरपूरास जातात. [५२]

वारकरी परंपरेत पिढ्यानपिढ्या सेवा करणारे भक्त पाहावयास मिळतात. प्रतिकुल परिस्थितीचा व गैरसोयीचा विचार न करता आपण स्वीकारलेले कर्तव्य निष्ठेने पूर्ण करणे गरजेचे असल्याने प्रत्येकाच्या मुखावर प्रसन्नता दिसून येते. अत्यंत तळमळीने प्रत्येक वारकऱ्याचे लक्ष पालखी प्रस्थान सोहळ्याकडे असते. 'माघवारी पायी दिंडी सोहळा' हा पारंपारिक वारसा सोलापूरला मिळाला आहे. माघवारीला जवळजवळ २५० वर्षांची परंपरा लाभलेली आहे. या परंपरेला ह. भ. प. नाशिककर महाराज यांच्या प्रेरणेने प्रोत्साहन मिळाल्याचे दिसून येते.[५३] ह. भ. प. माधव आप्पाजी वैद्य उर्फ नाशिककर महाराज हे नाशिककर दिंडीचे मूळ पुरूष होते. शहरातील नाशिककर महाराज, ह. भ. प. परशुराम मास्तर, ह.भ.प. औसेकर महाराज व गुंडामहाराजांच्या दिंडीबरोबर हजारो वारकरी पंढरपूरास जात.[५४]

### २.१.३ माघवारी पालखी प्रस्थान व रिंगण सोहळा

माघवारीला सोलापूर शहरातील दिंड्या सुरूवातीला स्वतंत्रपणे पंढरपुरास जात. अशा सर्व दिंड्या एकत्रित करून 'पालखी प्रस्थान सोहळ्याचा कार्यक्रम' अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या माध्यमातून ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज व त्यांचे सहकाऱ्यांनी सन २०१० पासून सुरू केला. या कार्यामध्ये ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज चव्हाण, प्रकाश महाराज व्यवहारे, शिवाजी महाराज शिंदे, ज्योतिराम चांगभले, शिवाजी व्हनकडे, बळीराम जांभळे, ह.भ.प. प्रभाकर वाघचौरे, ह.भ.प. नंदू महाराज रणशूर, ह.भ.प. श्रीहरी महाराज वैद्य (नाशिककर) यांचेही सहकार्य लाभते.[५५]

माघ शुध्द षष्टीला सर्व दिंड्या पद्मशाली समाजाचे दैवत मार्कंडेय मंदिरात एकत्रित येतात. तेथून त्या दिंड्या साठे चाळीतील महादेव मंदिरात येऊन, रथसप्तमीला या दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. तिऱ्हेमार्गे जाणाऱ्या या दिंड्यामध्ये सुमारे ४५ दिंड्यांचा समावेश असतो.[५६] सोलापूरहून तिऱ्हे मार्गे पंढरपूरकडे रवाना होणाऱ्या या दिंड्या मार्गावरील कामती, भिमा सहकारी साखर

कारखाना (टाकळी सिकंदर) आणि सुस्ते या ठिकाणी मुक्काम करतात. त्यावेळी मुक्कामाच्या ठिकाणी ग्रामस्थ या वारकऱ्यांची मनोभावे सेवा करतात. याठिकाणी भजन, कीर्तन व भारूडाचा कार्यक्रम आयोजित केला जातो याचा आजुबाजूच्या गावातील हजारो बांधव लाभ घेतात.[५७]

रिंगणसोहळा हे दिंडीचे प्रमुख आकर्षण असून, हे रिंगण 'गोल रिंगण' आणि 'उभे रिंगण' अशा दोन प्रकारचे असते. वारकरी संप्रदायाच्या इतिहासामध्ये फक्त आषाढी वारी मध्ये हा रिंगण सोहळा दिसून येतो. परंतु 'सोलापूर पालखी प्रस्थान सोहळयाच्या' वतीने माघ वारीला रिंगण सोहळा आयोजित केला जातो. पालखी प्रस्थानापूर्वी म्हणजेच माघ शुध्द "षष्ठीला" शहरातील होम मैदानावर गोल रिंगण सोहळा पार पडतो. पालखी मार्गावर पाठकर वस्ती कुरूल, भिमा सहकारी साखर कारखाना टाकळी सिकंदर व  दत्त विद्यालय सुस्ते या ठिकाणी 'गोल रिंगण' सोहळा होतो. बोधले महाराज मठापासून पंढरपूरातील दगडी पुलापर्यंत दशमीला उभे रिंगण होते. यामुळे वारकऱ्यांची मरगळ तर दूर होतेच शिवाय वारकरी संप्रदायाच्या कार्याला उभारी मिळते. रिंगण सोहळयासाठी सौदागर जगताप, विठ्ठल मंदिर भजनी मंडळ गवळी वस्ती  सोलापूर यांनी स्वतः अश्व खरेदी केले आहेत. ते वर्षभर अश्वांना सांभाळून माघवारी सोहळयात सेवाभावातून अश्व हजर करतात.[५८]

शहरातील 'रामकृष्ण हरी वारकरी सांप्रदायिक संकिर्तन दिंडी सोहळयाचे' आधारस्तंभ ह. भ. प. श्रीनिवास कंदी महाराज यांनी माघवारी पायी दिंडी सोहळा सुरू केला. त्यांच्यानंतर या दिंडीची सर्व जबाबदारी ह. भ. प. रमेश महाराज शिवापूरकर यांच्यावर सोपविण्यात आली. ही जबाबदारी ते निष्ठेने व श्रध्देने पार पाडतात. अनेक अडचणीवर मात करीत शिवापूरकर महाराजांनी प्रत्येक महिन्याची वारी सुरू केली. पंढरपूरास जाणाऱ्या अनेक दिंड्या सोलापूर शहरात येऊनच पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. अनेक वर्षापासून शेगांव येथून येणारी गजानन महाराजांची दिंडी सोलापूर शहरात दोन दिवस मुक्कामी असते. शहरातील उपलप मंगल कार्यालयात जगन्नाथ उपलप व त्यांचे कुटुंबीय या पालखीतील वारकऱ्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करतात. काडादी हायस्कूल या ठिकाणी लिंगायत समाजाकडून पालखीतील वारकऱ्यांची सेवा केली जाते. शहरातील दमाणी नगर भागातील रायचूरकर कुटुंबीय तिसऱ्या दिवशी दिंडीतील लोकांसाठी सकाळच्या जेवणाची व्यवस्था करतात. अनेक वर्षापासून शहरातील नाभिक संघ या दिंडीतील वारकऱ्यांची हजामत व दाढी मोफत करतात. यामध्ये पांडुरंग चौधरी यांची भूमिका महत्त्वाची असते.[५९]

## २.१.४ सोलापूर शहरातील वारकरी सांप्रदायाचे कार्य

वारकरी सांप्रदायामुळे येथे संतपरंपरा निर्माण झाल्याचे दिसून येते. नाशिक जिल्ह्यातील लासलगांव येथील सद्‌गुरू माधव महाराज (वैद्य) नाशिककर हे आपल्या माता-पित्याचे २१ वे अपत्य होते. त्यांचे पूर्वज पेशव्यांचे सरदार होते. त्यांचे मुळ आडनांव गाडगीळ परंतु त्यांच्या घराण्यात वैद्यकीय व्यवसाय असल्याने वैद्य आडनाव रूढ झाले. सोलापूर शहरातील वकील श्री पै यांच्यावर त्यांचा प्रभाव पडल्याने त्यांनी बाबासाहेब नाशिककर यांच्याकडून अनुग्रह घेतला. सोलापूर शहरात आल्यानंतर अनेक वर्षे ते चौपाड (सध्याचे चौपाड विठ्ठल मंदिर) भागात राहिले. ते संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक आणि उत्तम कीर्तनकार व प्रवचनकार होते.त्यांच्या कीर्तनाला शहरातून अनेक लोक गर्दी करत. यामध्ये शहरातील जुन्या मिलचे मालक नरोत्तम शेठ आणि तत्कालीन ब्रिटिश अधिकारी यांचाही समावेश होता.

चौपाड विठ्ठल मंदिर आणि भडंगे विठ्ठल मंदिराच्या स्थापनेमध्ये नाशिककर महाराजांचा मोलाचा वाटा होता. नाशिककर महाराजांनी चौपाड येथे वैशाख शुध्द द्वादशी शके १८५७ रोजी नाम सप्ताह साजरा करून 'श्री विठ्ठल-रूक्मिणी' मूर्तीची प्रतिष्ठापना केली आणि तेथेच आपला शिष्य संप्रदाय वाढविला. नंतरच्या काळात त्यांनी नाशिककर महाराज मठाची स्थापना करून त्याही ठिकाणी 'श्री विठ्ठल-रूक्मिणी' मूर्तीची प्रतिष्ठापना केली. आज या मठाच्या माध्यमातून त्यांचा वारसा त्यांच्या चौथ्या पिढीतील सद्‌गुरू श्रीहरी महाराज नाशिककर हे चालवित आहेत. श्रीहरी महाराज हे 'अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर' या संस्थेचे संपर्क प्रमुख म्हणून कार्य करीत आहेत.[६०]

वडार समाजात जन्माला येऊन शहरात वारकरी संप्रदाय वाढविण्याबरोबरच स्वतःच्या जातीचा उध्दार करून समाज प्रबोधन करण्याचे कार्य ह.भ. प. लक्ष्मण धोत्रे महाराज यांनी केले. मद्यपान व मांसाहाराशिवाय ज्यांनी दुसरा धंदा केला नाही, अशा वडार समाजातील लोकांच्या घरासमोर तुळसी वृंदावन उभारण्याचे कार्य महाराजांनी केले. नेहमीच ढोलकीच्या नादात डुलणाऱ्या वडार समाज बांधवांना त्यांनी हरिभक्तीचा नाच शिकविला. ह. भ. प. लक्ष्मण धोत्रे महाराज हे ह. भ. प. एकनाथ आप्पा वासकर महाराजांच्या फडाचे अनुयायी व उत्तम किर्तनकार होते. त्यांचा संत वाङ्मयाचा गाढा अभ्यास होता. व्यसनाधीन असलेल्या लोकांना अध्यात्माचा मार्ग दाखवून सामाजिक सुधारणा करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला. समाजाच्या वतीने मारूतीचे मंदिर व मठ

बांधून लोकांना मंदिराच्या व मठाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाकडे वळविले. माघ वारीच्या दिंडीची परंपरा सुरू करून लोक नेहमी भगवत भक्तीमध्ये कसे रममाण राहतील याचा दीर्घकालीन विचारही त्यांनी केला. लक्ष्मण महाराजांच्या या धार्मिक व अध्यात्मिक कार्यामुळे शहरात असणारा वडार समाज आपली जुनी रूढी, परंपरा विसरुन सद्मार्गास लागल्याचे पहावयास मिळते.[६१]

शहरात स्थायिक झालेल्या पद्मशाली समाजात हातमागाच्या व्यवसायाला जोड म्हणून महिला विड्या वळण्याचा व्यवसाय करीत. विड्या वळताना स्त्रिया काही गीते गुणगुणताना दिसून येतात. ही गाणी तेलगु आणि मराठी संस्कृतीशी मिळती-जुळती असल्याचे दिसते. सन १९०० सालापासून पद्मशाली समाजाचे लोक पंढरपूरास वारीच्या निमित्ताने जाऊ लागले. या समाजातील चिन्नय्याप्पा उडता व कृष्णप्पा गुजर यांनी पंढरपूरास जाणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देण्याचे काम केले.[६२] निरंजन स्वामी आणि नाशिककर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने पद्मशाली समाजाची पहिली दिंडी माघ शुध्द ७ शके १८७६ रोजी पंढरपूरास पायी गेली. या दिंडीत सुमारे १५० ते २०० स्त्री - पुरूष वारकऱ्यांचा समावेश होता. या पवित्र कार्यास प्रोत्साहन म्हणून समाजातील विठोबा सायण्णा भंडारी यांनी चांदीचे पाच तोडे आणि एक कळस दिंडीस भेट म्हणून दिला. तसेच यल्लप्पा गुंडला यांनी मुख्य पताकासाठी एक पितळी काठी दिली, तर अंतम्माबाई मारूतीराव गुंटुंक यांनी या पहिल्या दिंडीकरीता एक तांब्याची घागर दिली. अशा रितीने सुरू झालेली ही पद्मशाली समाजाची दिंडी 'श्री मार्कंडेय पद्मशाली दिंडी' या नावाने आजतागायत चालू आहे.

३५ वर्षापासून सोलापूर शहाराची मानाची ' श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थानाची ' सेवा श्री मार्कंडेय दिंडीकडेच आहे. सदर प्रस्थानास शहरातील विविध भागातून दिंडीचे प्रमुख व वारकरी मोठ्या संख्येने मार्कंडेय मंदिरात उपस्थित राहतात. त्यानंतर रथसप्तमीच्या दिवशी सायंकाळी मार्कंडेय मंदिरातून सर्व दिंड्यांचे पंढरपूरास माघी वारीसाठी एकत्रित प्रयाण होते. मार्कंडेय दिंडीच्या माध्यमातून 'श्रीविठ्ठल रूक्मिणी' आणि 'श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज मंदिर' बांधण्यात आले.

शंभर वर्षापूर्वीची पद्मशाली समाजाची ही दिंडी प्रगतशील होण्यामागे समाजातील अनेक लोकांचे बहुमुल्य असे योगदान राहिले आहे. त्यामध्ये ह. भ. प. तुकाराम वड्डेपल्ली, ह. भ. प. नारायण कोटा, ह. भ. प. एकनाथ संगम, ह. भ. प. राजमल बोमड्याल इत्यादी महाराजांचा त्यात समावेश होतो.[६३] पंढरपूरास जाणाऱ्या पद्मशाली समाजातील वारकऱ्यांची पंढरपूर येथे राहण्याची

व्यवस्था व्हावी म्हणून एक धर्मशाळा बांधली आहे. ही धर्मशाळा बांधण्यामध्ये वारकरी दांपत्य अंतम्मा गुंटुंक व मारूतीराव गुंटुंक यांचा मोलाचा वाटा होता.[६४] या समाजात अनेक किर्तनकार व प्रवचनकार होऊन गेले. त्यामध्ये सिद्रामप्पा सायण्णा सोमा, गोविंदप्पा सिद्रामप्पा सग्गम, एकनाथ तुकाराम सग्गम, बसवय्या मुशन इत्यादींचा समावेश होतो. नरसय्या व्यंकटरामय्या गज्जेली आणि मल्लय्या बोगा हे वेदांतावर प्रवचन करणारे प्रवचनकार म्हणून ओळखले जात.

पद्मशाली समाजातील विडी कामगारांमध्ये भक्तीभाव व सद्भावना जागृत करण्यासाठी विडी कारखान्यात जाऊन किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून लोकजागृती व समाज जागृती करण्याचा प्रयत्न पुरूषांप्रमाणे महिलांही करीत होत्या. यामध्ये प्रभावतीबाई महादेव मॅकल, कमलाबाई अन्नम, राजमनी शिवलिंगप्पा वंगारी, अनुसयाबाई सिद्रामप्पा सारंगी, सुशिला नारायण कुसूर, राधाबाई जिंदम इत्यादी महिलांचा समावेश होता. या महिला काम करणाऱ्या लोकांचा वेळ वाया जाऊ नये व त्यांच्यामध्ये भक्तीभावाबरोबरच लोकजागृती व समाजजागृती व्हावी यासाठी शहरातील निरनिराळ्या विडी कारखान्यात जाऊन धार्मिक प्रवचन करीत असत.[६५] अशा प्रकारे श्रमाबरोबर श्रवण करणाऱ्या या कष्टकरी पद्मशाली समाजात वारकरी संप्रदायाच्या कार्याबरोबरच लोकजागृतीचे कार्य आजही अखंडपणे चालू आहे. मुळात तेलगु असलेला हा समाज आपली मुळची संस्कृती जपत महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीशी एकजीव झाला.

उत्तम किर्तनकार, म्हणून ओळखले जाणारे शहरातील ह. भ. प. अनंत इंगळे महाराज यांनी इ. स. १९८० साली 'संत मुक्ताई भजनी मंडळ' स्थापना करून माघ वारी दिंडी सुरू केली. वडीलांनी सुरू केलेल्या वारकरी सांप्रदायाच्या कार्यात भर घालण्याचे काम त्यांचे पुत्र सुधाकर इंगळे महाराज हे सातत्याने करीत आहेत. आळंदीमध्ये ज्याप्रमाणे वारकरी सांप्रदायाचे शिक्षण दिले जाते त्याच धर्तीवर सोलापूर शहरात सुधाकर महाराजांनी 'संत मुक्ताई वारकरी शिक्षण संस्था' सुरू केली. या संस्थेत १० ते १६ वयोगटातील ५५ बाल वारकरी विद्यार्थ्यांना मोफत अध्यात्मिक शिक्षणाच्या जोडीला मृदंग, टाळ, तबला, वीणा, चिपळी, पेटी ही वाद्ये वाजविण्याबरोबरच अभंग, हरिपाठ, दासबोध, विचार चंद्रोदयाचे श्लोक, संतांचे चरित्र, रूपावली, भजन, किर्तन व प्रवचन यांचे शिक्षण दिले जाते. किर्तन, प्रवचन, गायन, वादन इत्यादीं परीक्षाही या सर्व विद्यार्थ्यांना द्याव्या लागतात. यामुळे अध्यात्मिक शिक्षण संस्थेत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा प्रचलित असलेल्या शिक्षण संस्थेमधील शिक्षणाप्रमाणे धडे

गिरविताना दिसून येतो. भविष्यात सदर विद्यार्थ्यांना अर्थाजनासाठी उपयोग होतो. या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या वारकरी विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रवचन व किर्तन कार्यक्रमांसाठी नेले जाते.

मुक्ताई शिक्षण संस्थेचा दिनक्रम पहाटे पाच वाजल्यापासून सुरू होतो. पहाटे पाच ते सहा मृदंग वादनाचा सराव, त्यानंतर प्राणायाम, जपनाम, ध्यान इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. आठ वाजता श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे पठण, गुरूमंत्र, रामकृष्ण जप, ओंकार पुष्पाजंली, ज्ञानदेव, महादेव, मुक्ताई, विठ्ठल-रूक्मिणीची आरती, विचार चंद्रोदयाचे पठण व प्रवचन होते. ११ ते ५ शालेय शिक्षणाचे वर्ग, संध्याकाळी ६ वाजता हरिपाठ, ७ वाजता गायन भजनाचा सराव, त्यानंतर रात्री दहा वाजेपर्यंत शालेय अभ्यास घेतला जातो. झोपण्यापूर्वी पुन्हा नामस्मरण केले जाते. या संस्थेची सर्व जबाबदारी सुधाकर इंगळे महाराज सांभाळतात. या संस्थेतून भावी वारकरी पिढी तयार होत आहे.[६६]

## २.२ वीरशैव (लिंगायत) संप्रदाय

प्राचीन महाराष्ट्रातील शिवोपासक संप्रदायापैकी लिंगायत हा एक संप्रदाय आहे. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सरहद्दीवर बेळगांव, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या परिसरात मोठ्या प्रमाणावर हा संप्रदाय विस्तारलेला आहे.[६७] शिव हे या संप्रदायाचे आराध्य दैवत असून, शिवाची अन्योन्यभक्ती हे या संप्रदायाचे प्रमुख साध्य आहे. दक्षिणेत भक्तीच्या पायावर अधिष्ठित असलेली शिवोपासना किती तरी प्राचीन काळापासून रूढ आहे. वीरशैवांच्या भक्तीमागे विशिष्ट तत्त्वज्ञान, आचार, सामाजिक समता, देशी भाषांचा पुरस्कार इत्यादी बाबतीत एक चौकट निर्माण होऊन ती परंपरेने अखंडपणे चालत राहिली. म्हणून या भक्तीमार्गास संप्रदायाचे स्वरूप प्राप्त झाले.[६८]

वीरशैव आणि लिंगायत या दोन प्रमुख नावानी समाजात परिचीत असलेला हा संप्रदाय लिंगवत, लिंगानुभव, लिंगपंथ, इष्टलिंग, जंगम, शरण, वचन, बसव, शक्ती विशिष्टाद्वैत, षट्‌स्थळ, आगम, शिवानुभव, शिवपथ, शिवसमय, शिवाद्वैत, शिवाचार, शिवयोग, शिवधर्म अशा विविध नावांनी ओळखला जातो.[६९] अल्लमप्रभुची वीरशैव प्रणाली, रेवणसिध्द, मरूळसिध्द इत्यादींच्या शिष्य परंपरेने बसवेश्वरांपर्यंत आल्यानंतर इ. स. ११६० च्या सुमारास बसवेश्वरांनी वीरशैव (लिंगायत) पंथाला निश्चित स्वरूप दिले.[७०] लिंगायत लोक हे बसवेश्वरांच्या अगोदर क्वचित ठिकाणीच आढळत होते. इतर मतातील लोकांना वीरशैव मतात आणण्याचे काम बसवेश्वरांनी आरंभिले.[७१]

मराठीतील वीरशैवाचे बरेचसे मध्ययुगीन वाङ्मय नष्ट झाले असले तरी काही महत्त्वाचे ग्रंथ शिल्लक आहेत. त्यामध्ये 'सिध्दांत-शिखामणी', 'विवेक चिंतामणी परमरहस्य' आणि 'लिला विश्वंभर' इत्यादी ग्रंथाचा समावेश होतो. या ग्रंथांना 'ग्रंथपंचक' म्हणून मराठी वीरशैवात विशेष महत्त्व आहे. या सर्व ग्रंथामध्ये रेणुकाचार्य लिखित 'सिध्दांत-शिखामणी' हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. कारण या ग्रंथात वीरशैव संप्रदायाची प्राचीनता पहावयास मिळते. वीरशैव संप्रदायाचा धर्मग्रंथ म्हणून प्रसिध्द असलेल्या 'सिध्दांत-शिखामणी' या संस्कृत भाषेतील ग्रंथाचे विविध भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. या ग्रंथाचे मराठी भाषांतर सोलापूरातील श. दे. पसारकर यांनी केले आहे.[७२]

वीरशैव या शब्दातील 'वी' या धातूचा अर्थ व्याकरणकार पाणिनी यांनी 'गती' असा दिला आहे तर काही ग्रंथातून 'वी' धातूचा अर्थ 'विद्या' असा दिला आहे. 'र' चा अर्थ रमणे अर्थात आनंद घेणे असा होतो. 'वी' या शब्दापासून निघणाऱ्या विद्या या अर्थानुसार शिवजीवाचे लिंगाचे एकत्त्व सांगणाऱ्या विद्येत जो शिवभक्त रमतो तोच 'वीरशैव' होय.[७३] शैव पंथातून उदयास आलेल्या शिवाला दैवत मानून त्याचे प्रतिक असलेल्या शिवलिंगाची पूजा करणाऱ्या जहाल स्वरूपाच्या धर्माला 'वीरशैव' म्हणून ओळखले जाते.[७४] वीरशैवांसाठी लिंगायत हा शब्द सर्वत्र वापरला जातो. अंगावर नित्य लिंगधारणा करण्याच्या प्रथेवरून हा शब्दरूढ झाला आहे. लिंगायत या शब्दाची व्याख्या करताना लिंगानंद स्वामीजी म्हणतात की, 'इष्टलिंग धारण करणारा तो लिंगवत'. गुरूने दिक्षाविधीतून दिलेल्या इष्टलिंग धारणेशिवाय कोणालाही लिंगायत म्हणता येणार नाही. लिंगायत या शब्दाचा मुळ अर्थ (लिंग + आयत) लिंगेन आयत 'लिंगायत' म्हणजेच इष्टलिंग धारण करतो तो लिंगायत होय.[७५] लिंगायत पंथांचा ज्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार केला त्यामध्ये श्री बसवेश्वर, श्री अल्लमप्रभु, श्री सिध्दरामेश्वर, चन्नबसवेश्वर आणि अक्कमहादेवी या पाच विरक्तांचा समावेश होतो.[७६]

### २.२.१ महात्मा बसवेश्वर व अनुभव मंटप

१२ व्या शतकात कर्नाटक राज्यात तत्कालीन समाज व्यवस्थेच्या विरूध्द विद्रोह करणारे संत बसवेश्वरांचा जन्म सनातनी हिंदु धर्मीय घराण्यात झाला असला तरीही, त्यांनी हिंदु धर्मातील तत्कालीन सामाजिक व धार्मिक वर्णव्यवस्थेला प्रचंड विरोध केला, तसेच होम-हवन, यज्ञ, अग्निपूजा निषिध्द मानली.[७७] बसवेश्वरांना कोणीही वीरशैवाची दीक्षा दिली नाही तर, ते स्वतःच

वीरशैव झाले. त्यांनी नव्या धर्माची स्थापना न करता जुन्या शैववादात क्रांतीकारक बदल घडवून त्याला नवे रूप दिले.[७८]

बसवेश्वर हा बिज्जलांचा मुख्यमंत्री होता, त्यांचा काळ हा वीरशैव संप्रदायाच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.[७९] बिज्जलांची पहिली राजधानी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे ही होती. या ठिकाणच्या राज्यव्यवस्थेची जबाबदारी बसवेश्वरांवर होती. इ. स. ११३२ ते इ. स. ११५३ या काळात ते मंगळवेढा येथे राहत होते.[८०] अंध:विश्वास जोपासणाऱ्या आणि रूढीवादी, धार्मिक, सामाजिक व्यवस्थेला विरोध करणारे महान क्रांतीकारक म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. त्यांनी धर्म, वर्ग, वर्ण, वंश, जात, लिंग, व्यवसाय अथवा अन्य सामाजिक भेदभाव आणि त्यातून निर्माण झालेल्या श्रेष्ठ-कनिष्ठ प्रवृत्तींना निकराचा विरोध केला. स्त्री आणि पुरूष यांची योग्यता समान मानावी, दोघांचे हक्कही सारखेच मानावे, प्रत्येक मानावाला व्यवसाय स्वातंत्र्य असून, कोणताही व्यवसाय हा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असूच शकत नाही. मोक्ष, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, दैव, कर्म यासारख्या गोष्टी अनुभववादी, प्रत्यक्षवादी, विज्ञानवादी दृष्टीकोनातून पाहण्याचा आग्रह बसवेश्वरांनी धरला होता.[८१] बसवेश्वरांच्या या विचारांचा प्रभाव सोलापूर शहरावर पडल्याने पुढील काळात शहरात वीरशैव संप्रदाय वाढीस लागला.

महात्मा बसवेश्वरांनी अठरा-पगड जातीतील स्त्री-पुरूषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी १२ व्या शतकात कर्नाटकातील कल्याणी येथे 'अनुभव मंटप' नावाचे सामाजिक व सांस्कृतिक विचारपीठ निर्माण केले. या अनुभव मंटपात स्त्री-पुरूष मिळून ७७७ सदस्य होते, त्यामध्ये सुमारे ७७ स्त्रिया होत्या. या स्त्रियांनी अनुभव मंटपात राहून वीरशैव पंथाची दिक्षा घेतली होती. या सभासदांमध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, वय, वर्ग, व्यवसाय, भाषा इत्यादींबाबत कोणताही भेदभाव नव्हता  या मंटपात सहभागी होणाऱ्या पुरूषांना 'शरण' व स्त्रियांना 'शरणी' असे संबोधले जात.[८२] कल्याणीचा अनुभव मंटप हे शिवभक्तांचे परमार्थाचे, तत्त्वचर्चेचे केंद्र बनले. श्रेष्ठ शिवयोगी अल्लमप्रभु हे सन ११६२ मध्ये या पीठाचे आचार्य होते.[८३] सोन्नलगीचे (सोलापूर) सिध्दरामेश्वर हे सोलापूर वीरशैवांचे प्रथमगण म्हणून ओळखले जातात, ते ही या अनुभव मंटपात होते.[८४] भारताच्या कानाकोपऱ्यातून अनेक शिवभक्त आणि शिवयोगी या मंटपात येऊन शिवभक्तीत समरस होत. हा अनुभव मंटप म्हणजे महात्मा बसवेश्वरांच्या ध्येयदृष्टीचे, कर्तृत्त्वाचे आणि शिवभक्तीचे प्रतिक बनले

होते. याविषयी डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात की, 'अनुभव मंटप म्हणजे १२ व्या शतकातील समतेचे आणि ज्ञानाचे ते धर्मपीठ होते. हे धर्मपीठ देशाला आदर्शभूत झाले. या अनुभव मंटपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांनी स्त्री - पुरूष समानतेची घोषणा केली.'[८५] या अनुभव मंटपाद्वारे सिध्दरामेश्वरांना वीरशैवाचे तत्त्वज्ञान समजल्याने या पंथाचा प्रसार करण्यात सिध्दरामेश्वरांचा मोलाचा वाटा होता.

### २.२.२ अल्लमप्रभु

अल्लमप्रभु हे वीरशैव पंथाचे प्रणेते आणि नाथपंथाचे प्रवक्ते गोरक्षनाथ यांचे गुरूबंधू म्हणून ओळखले जात.[८६] सन ११६२ मध्ये अल्लमप्रभु हे बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपाचे आचार्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात वैराग्य होते, सिध्दरामेश्वरांनी त्यांना अनुसरले होते. यावरून अल्लमप्रभुंच्या प्रभावातूनही सोलापूर परिसरात वीरशैव सांप्रदायाचा प्रसार झाल्याचे सूचित होते.[८७] महात्मा बसवेश्वराला 'षट्स्थल सिध्दांत' शिकविणाऱ्या अल्लमप्रभुंनी सर्व प्रकारच्या बाह्य अनुष्ठानाला नाकारून ध्यानप्रधान मोक्षमार्ग अवलंबविण्यावर भर दिला होता.[८८]

### २.२.३ श्री सिध्दरामेश्वर

श्री सिध्दरामेश्वरांचा जन्म ' सोन्नलीगे ' येथे मुद्दगौडा व सुग्गलादेवी यांच्यापोटी इ. स. ११२७ मध्ये झाला.[८९] सिध्दरामाचे बालपणीचे नांव धुळीमहंकाळ होते हे नाव सिध्दरामेश्वरांच्या कुलदैवताचे नांव आहे.[९०] बाराव्या शतकाच्या दरम्यान बसवेश्वरांचे समकालीन म्हणून श्री सिध्दरामांना ओळखले जाते, त्यांनी महाराष्ट्रात लिंगायत पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला.[९१] महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात अक्कमहादेवी, अल्लमप्रभु, चेन्नबसवण्णा यांच्याबरोबर सिध्दरामेश्वर होते. श्री अल्लमप्रभु यांनीच सिध्दरामांना कल्याणच्या अनुभव मंटपात नेले होते. चेन्नबसवेश्वरांकडून सिध्दरामांना इष्टलिंगाची धारणा आणि षट्स्थळ ज्ञानाचा बोध झाला.[९२] शैवीमताचे श्री सिध्दाराम यांना वीरशैव सांप्रदायात सामील करून घेण्याच्या अगोदर चेन्नबसवने सिध्दरामांना सांगितले होते की, " दुसऱ्या कोणत्याही देव-देवतांची पूजा करू दिली जाणार नाही. तसेच दुसऱ्या देव-देवतांच्या पुजांमध्ये विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींशी ही संबंध ठेवू नये." [९३]

सोन्नलीगेचे सिध्दरामेश्वर सोलापूरातील वीरशैवांचे प्रथमगण म्हणून ओळखले जातात. त्यांची श्रीशैलच्या मल्लिकार्जूनावर अढळ श्रध्दा होती. त्यांनी श्रमदानातून शहरात सिध्देश्वर

तलावाची निर्मिती केली. दुष्काळात गाई-गुरे दत्तक घेऊन सांभाळली. दिन-दुबळयांसाठी अन्नछत्र चालविले. अंगारे-धुपारे देऊन लुबाडणाऱ्या ढोंगी लोकांपासून भक्तांचे संरक्षण केले. सर्व धर्मीय सामुदायिक विवाह घडवून आणण्याचा अभिनव प्रयोग करून त्या काळात सामाजिक क्रांतीतील आपले योगदान नोंदविले. बसवकल्याणच्या अनुभव मंटपात शरणासोबत आपल्या ज्ञानाचे योगदान देण्यात सिध्दरामांचे नांव अत्यंत आदराने घेतले जाई. सोलापूर परिसरातील परम, आदरणीय, प्राणतत्त्व अशी सिध्दरामेश्वरांची ख्याती व अनुभूती होती व आजही आहे.[९४] त्यांनी वीरशैव संप्रदायाच्या प्रसाराबरोबरच ६८ हजार वचने रचल्याचा उल्लेख सापडतो. परंतु यापैकी १३०० वचनेच शिल्लक आहेत. वीरशैव पंथाकरीता सिध्दरामांची ही वचने म्हणजे एक अमूल्य ठेवा आहे.[९५] त्यांनी कानडी भाषेतून धर्म जागृतीचाही प्रयत्न केला. त्यांच्यासारख्या सामर्थ्यशाली तत्त्वचिंतकाचे वास्तव्य महाराष्ट्रात असल्याने या भागातील मराठी लोकांना कन्नडिगांच्या सहवासाने धर्म विचारांचा चांगला परिचय झाला.[९६] सिध्दरामेश्वर हे विजापूर जिल्ह्यातील व्यापारासाठी प्रसिध्द असलेल्या शोलापूर या नगरीचे होते असाही उल्लेख सापडतो. सुरूवातीच्या वीरशैव संप्रदायाच्या अनुयायांमध्ये त्यांना उच्च स्थान प्राप्त झाले होते. कवि राघवांक रचित 'सिध्दरामपुराणामध्ये' सिध्दरामाच्या जीवनाविषयीची संपूर्ण माहिती मिळते.[९७]

### २.२.४ वीरशैव पंथाचे आचार व तत्त्वज्ञान

सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वर मंदिराचे पुजारी हिरेहब्बु यांच्यात पूर्वी लिंग धारणेची पध्दत नव्हती. परंतु सोलापूरातील लिंगायत व्यापारी आप्पासाहेब वारद यांनी हिरेहब्बु यांच्यात 'लिंग धारणे' ची पध्दत सुरू केली. तेंव्हापासून हिरेहब्बु घराणे लिंग धारण करीत आहेत. लिंग धारणेचा आचार धर्म समाजात रूजावा, याचा प्रसार व्हावा, यासाठी आप्पासाहेब वारदांनी हजारो रूपये खर्च केले होते.[९८] लिंग पुराणात शैल, रत्नमय, धातुमय, काष्टमय इत्यादी लिंगाचे सोळा प्रकार सांगितले आहेत. लिंगाच्या मूळात ब्रह्मदेव, मध्यात विष्णु तर रूद्राबाहेर महादेव असतात. लिंगाच्या वेदीत त्रियांबिका, महादेवी निवास करते. लिंग कोणत्याही प्रकारचे असो, त्याची भक्तीभावाने पूजा केल्यास शुभ फळाची प्राप्ती होते.[९९] 'लिंगधारणा' हे वीरशैवांचे प्रमुख आचार लक्षण आहे. सद्‌गुरूने दीक्षापूर्वक दिलेले 'इष्टलिंग' हे सोने, चांदी, लाकूड इत्यादींपासून बनविलेल्या सज्जिकेत घालून ते जानव्यासारखे गळयात धारण केले जाते.[१००]

कपाळावर व सर्वांगावर भस्मलेपन करणे, 'ॐ नमः शिवाय' हा गुरूमंत्र मुखाने म्हणणे, अष्टावरण व पंचाचाराचे पालन करणे, हे महत्त्वाचे आचार या पंथात आहेत. गुरु, लिंग, जंगम, विभूती, रूद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद ही 'अष्टावरणे' होत. शिवाचार, लिंगाचार, सदाचार, भृत्याचार आणि गणाचार हे लिंगायत धर्मातील 'पंचाचार' आहेत.[१०१] याबाबतीत चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणतात की, 'सनातन वीरशैव धर्मात अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थळ ही तीन प्रमुख तत्त्वे स्वीकारलेली आहेत. ही तीन तत्त्वे क्रमशः साधकाचे अंग, प्राण व आत्मा म्हणून मान्य केले जातात'.[१०२] सिध्दरामेश्वरांनीही अष्टावरण चिन्हांची महती सांगितली आहे. त्यांच्या अष्टावरण त्रिविधीत १४४ पदे आहेत.[१०३]

रेणुकाचार्यांनी 'सिध्दांत शिखामणी' द्वारा वीरशैव तत्त्वज्ञानाची जी समन्वयात्मक भूमिका मांडली. तीच बसवेश्वरांनी आपल्या अनुभव मंटपाद्वारे प्रस्तुत केली. वीरशैवात वैदिक आणि अवैदिक परंपराशी नाते सांगणाऱ्या अनुक्रमे पंचाचार्य आणि विरक्त या दोन विचारधारा निर्माण झाल्या. महाराष्ट्रातील वीरशैव 'पंचाचार्य' विचारधारेशी समन्वित झाले. कर्नाटकातील वीरशैव 'विरक्त' परंपरेशी संबध्द झाले. सिध्दांत शिखामणीच्या आधारे हा संप्रदाय वैदिक ठरतो. [१०४]

'षट्स्थळ' हे वीरशैवांच्या धर्म आणि तत्त्वज्ञान विषयक व्यवस्थेतील तात्त्विक व अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे तत्त्व आहे. जीव व शीव यांच्या सामरस्य मार्गातील 'षट्स्थळ' हे एक अध्यात्मिक तत्त्व आहे. 'षट्स्थळ' हा वीरशैवांचा ज्ञानमार्ग व ज्ञानयोग आहे.[१०५] सत्, चित्, आनंद या स्वरूपात आढळणारे अद्वितीय परब्रह्म हेच 'शिवतत्त्व' या नावाने ओळखले जाते, त्याचेच दुसरे नाव 'स्थळ' हे आहे. स्थळाचे 'लिंगस्थळ' व 'अंगस्थळ' असे दोन प्रकार पडतात. 'लिंगस्थळ' म्हणजे उपास्यदैवत शिव होय आणि 'अंगस्थळ' म्हणजे उपासक जीव होय. या उपास्य शिवाशी उपासक जीवाचे 'सामरस्य' होणे याला वीरशैव 'लिंगांग सामरस्य' असे म्हणतात. याशिवाय योगांग, भोगांग आणि त्यागांग हे लिंगाचे आणखी तीन भाग सांगितले आहेत. योगांगाने जीवाचा शिवाशी संयोग होतो, भोगांगामुळे जीवाला शिवाशी सायुज्यता प्राप्त होते. त्यागामुळे जीवाची जगाची अनित्यता पटते आणि त्याचा तो त्याग करतो.[१०६]

भक्ती व नीती या तत्त्वांना वीरशैव संप्रदायात विशेष महत्त्व आहे. वीरशैवांनी मूर्तीपूजा व तीर्थयात्रा या रूढ मार्गावर टीका केली असून जंगमालाच जगदीश्वर मानले. पंचसुतकाचे बंधन,

जातीभेद, स्त्रियांची शिवाशिव, अग्निपुजा, प्रेतसंस्कार इत्यादी गोष्टी लिंगायत पंथ मानत नाही.[१०७] 'एकेश्वरवाद' हे वीरशैव शरणांच्या भक्तीचे महत्त्वपूर्ण तत्त्व होते. बसवेश्वराने जगाला ईश्वराचे कार्यागार मानले. जातीभेद संपला पाहिजे, असा जातीविरहित समाजरचनेचा विचार बसवेश्वरांनी मांडला. माणूस जन्माने नव्हे तर त्याच्या कर्माने ओळखला जातो, असे मत त्यांनी मांडले.[१०८]

### २.२.५ दासोह

'दासोह' हा शब्द कल्याण नगरीतील अनुभव मंटपात अन्नछत्र किंवा अतिथी पुजनासाठी कानडी भाषेतून रूढ झालेला शब्द आहे. मराठी भाषिक लिंगायत ही 'दासोह' हाच शब्द वापरतात. याशिवाय दासोहसाठी लिंगाराधन किंवा लिंगे घालावयाची अशी ही परिभाषा वापरली जाते. श्रावण महिन्यात दररोज किंवा सोमवारी जंगमांना वगैरे भोजन घालण्याच्या प्रथेस वरील परिभाषा वापरतात. सोलापूर शहरातील आप्पासाहेब वारद यांच्या घरी ही 'दासोही' प्रथा होती.[१०९] 'दासोह' घालणारे सोलापूरातील ते पहिले लिंगायत म्हणून ओळखले जातात. अतिरिक्त संपत्तीच्या वाटपाची कल्पनाच 'दासोह' या नावाने ओळखली जाई असे सोमनाथ रोडे यांनी म्हटले आहे.[११०] आपल्या गरजांची पूर्तता झाल्यानंतर जी संपत्ती उरते ती लोककल्याणासाठी खर्च करावी, हा 'दासोह' चा मुख्य उद्देश आहे. 'दासोह' हा शब्द दान शब्दाशी मिळता-जुळता वाटत असला तरी मुळतः 'दासोह' म्हणजे दान नव्हे, सामान्यतः 'दासोह' म्हणजे 'अन्नसंतर्पण' होय. वीरशैवांमध्ये शिवप्रसाद स्वरूपात 'दासोह' घातले जाते व स्वीकारले जाते, अद्यापि ही अनेक मठांमध्ये दासोह प्रथा प्रचलित आहे. नम्रतेच्या व कृतज्ञतेच्या भावनेतून गरजू समाज बांधवांना दिलेले कोणत्याही प्रकारचे सहकार्य म्हणजे 'दासोह' होय.[१११] सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्दरामेश्वरांच्या मंदिरात कायमस्वरूपी 'दासोह' चालविले जाते. यासाठी अनेक भाविक पैशाच्या किंवा अन्नधान्याच्या स्वरूपात दान देतात.

### २.२.६ मठ

आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये वीरशैव संप्रदायाचा प्रसार होण्यापूर्वी लाकुलिश पाशुपत संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालेला होता. या संप्रदायाच्या विद्वान आचार्यांनी सामाजिक कार्याद्वारे अनेक कामे पूर्ण केली. मठ व मंदिरांची उभारणी, अन्नदान, शिक्षण केंद्र चालविणे, जलाशयाची निर्मिती करणे, अशा स्वरूपाच्या कामांचा त्यात समावेश होतो. त्यामुळे कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशात हा संप्रदाय मोठ्या प्रमाणावर प्रसार पावला. मात्र वीरशैव

पंथाच्या उदयानंतर पाशुपत संप्रदाय त्यात विलिन झाल्याने कर्नाटकातील पाशुपत पंथीयांचे संपन्न असे मठ वीरशैवांच्या ताब्यात गेले. वीरशैवांनी त्या मठांच्या गुरूपरंपरा स्विकारून या मठांद्वारे त्यांनी विद्यादानाचे कार्य चालविले आहे.[११२]

महाराष्ट्रात एक हजार वर्षांपेक्षा अधिक प्राचीन वीरशैव मठ आहेत. वीरभद्र, रेवणसिध्देश्वर, सिध्दरामेश्वर इत्यादी वीरशैव धर्मप्रचारकांची मंदिरे रेणावी, वीटा, येडूर, सोलापूर इत्यादी ठिकाणी आहेत.[११३] वीरशैवांची एकूण सहा धर्मपीठे आहेत. या धर्मपीठांतर्गत त्यांचे हजारो मठ देशात स्थापन झालेले आहेत. वीरशैव समाजात मठांचे स्थान अत्यंत उच्च दर्जाचे मानले जाते.[११४]मठ ही वीरशैवांची एक परंपरा आहे. या मठांतर्गत सांस्कृतिक धार्मिक व सामाजिक संस्था चालविल्या जातात. धर्मप्रसार व समाज संघटन या मुळ उद्देशातूनच मठांची निर्मिती झाली. कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश हिमाचल प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये मठ संस्था विखुरलेल्या आहेत. जंगम, स्वामी, हिरेमठ इत्यादी लोक त्या त्या भागातील वीरशैवांचे धर्मविषयक कार्य करतात. वीरशैव धर्म आणि त्यांचे मठ यांचे परस्पर निकटचे संबंध आहेत.[११५]

सिध्दरामेश्वर हे वीरशैव लिंगायत पंथाचे प्रसारक व प्रचारक होते. त्यांच्यानंतर सोलापूर शहर व आसपासच्या परिसरात अनेक वीरशैव मठांची स्थापना झाली. श्री किरिटस्वामी मठ हा उज्जैनी शाखेचा नंदीमठ तीनशे वर्षांपेक्षा जुना असून, ते सोलापूरात येण्यापूर्वीच स्थानिक लिंगायत व्यापाऱ्यांनी या मठाची स्थापना केली. हा मठ शहरात उत्तर कसब्यात आहे.[११६] शिवाय बाळीवेस येथे मल्लिकार्जून मंदिरासमोर 'शिवशरणी श्री रूद्रांबिकादेवी मठ' आहे.[११७] मौजे होटगी यांच्या मठाच्या अनेक शाखा सोलापूर शहर व परिसरात आहेत, त्यामध्ये श्री बृहन्मठ होटगी उत्तर कसबा, बाळीवेस, कुंभारी, श्रीक्षेत्र धोत्री, इत्यादी ठिकाणी या लिंगायत मठाच्या शाखा आहेत. या मठांचा कारभार श्रीशैल पीठाच्या अधिपत्याखाली चालतो. इ. स. ५ व्या शतकात 'श्री बृहन्मठ होटगी' मठाचे अध्यक्ष श्री ष. बृ. मल्लिकार्जून शिवाचार्य महास्वामीजी यांनी या मठाचा जीर्णोध्दार केल्याची माहिती मिळते. याशिवाय सोलापूर शहर व परिसरात लिंगायत पंथाचे अनेक मठ व आश्रम पाहावयास मिळतात.[११८]

### २.२.७ वीरशैव पंथाचे कार्य

महाराष्ट्रातील वीरशैव संप्रदायाच्या प्रसार कार्यातील सोलापूरचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. शहरात असणाऱ्या सिध्दरामेश्वरांच्या चिरंतन स्मारकामुळे व महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रच्या

सीमेवर हे शहर असल्याने ते वीरशैव संप्रदायाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.[११९] कल्याणी येथील अनुभव मंटपातून सिध्दरामेश्वरांबरोबर अनेक वीरशैवी सोलापूर शहर व परिसरात येऊन स्थायिक झाले. नंतरच्या काळात त्यांनी वीरशैव पंथाचा प्रसार केला. सोलापूर जिल्ह्याच्या शेजारी असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यात सिध्दरामेश्वरांसंबंधी १२ शिलालेख सापडले आहेत.[१२०] आनंद कुंभार यांनी अभ्यासलेल्या विविध शिलालेखातून वीरशैव धर्म प्रसाराच्या पाऊलखुणा दिसून येतात. जिल्ह्यात कामती खुर्द, तडवळ, गुंजेगांव, आचेगांव, अक्कलकोट व कुडल या ठिकाणी सापडलेले हे शिलालेख सिध्दरामेश्वरांच्या वीरशैव धर्माच्या प्रसाराची माहिती देतात. यातील बरेचशे शिलालेख हे कन्नड भाषेतील आहे.[१२१] वीरशैव पंथाचा प्रसार करीत असताना श्री सिध्दरामेश्वरांनी कन्नड भाषेत केलेले वाङ्मय महत्त्वाचे आहे.[१२२] मराठी भाषिक लिंगायतांना लिंगायत धर्माचे आचार, विचार समजावेत म्हणून सिध्दरामेश्वरांनी लिहून ठेवलेल्या संस्कृत व कन्नड साहित्याचे आप्पासाहेब वारदांनी जवळपास २५ ते ३० ग्रंथांचे मराठी भाषेत भाषांतर केले.[१२३]

वीरशैव सांप्रदायांच्या प्रमुख अनुयायांमध्ये पुरोहित, व्यापारी, शेतकरी आणि दस्तकार लोकांचा समावेश होतो. पुरोहित वर्गाचे लोक 'जंगम' या नावाने ओळखले जातात ते उपदेश देतात. जंगमातील काही लोकांनी आपल्या आर्थिक सुधारणेकरीता व्यापार व दुकानदारीचा व्यवसाय सुरू केला आहे. वीरशैव सांप्रदायातील जंगम म्हणून ओळखले जाणारे पुरोहित हे मुळ ब्राह्मण पुरोहित वर्गाचाच एक भाग होता. परंतु ज्यावेळी वंशपरंपरागत मंदिराच्या पुजाऱ्यांचे वर्चस्व वाढू लागले, तेंव्हा या वर्गाने आपली जंगम परंपरा चालू ठेवली.[१२४]

वीरशैव पंथाचा प्रसार हा कर्नाटकाबरोबरच महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या राज्यातूनही झाला. महाराष्ट्रातील अनेक शिवमंदिराचे पुजारी आजही जंगम आहेत. तसेच वाणी, कोष्टी यासारखे लिंगायत पंथी व्यावसायिकही महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेले आहेत.[१२५] रमेंद्रनाथ नंदी यांच्या मते वीरशैव सांप्रदायाची स्थापना आणि विकासामध्ये व्यापाऱ्यांची प्रमुख भूमिका असल्याचे स्पष्ट होते. कारण जंगमानंतर या सांप्रदायात व्यापाऱ्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.[१२६] सन १६९० च्या सुमारास सोलापूर हे तेल, भूसार, हळद, तुप इत्यादी मालाचा पुरवठा करणारे केंद्र म्हणून भरभराटीला आले होते. याच सुमारास विजापूरात साथीच्या रोगाने अनेक लोक मृत्युमुखी पडले त्यामुळे तेथील लिंगायत व्यापारी सोलापूरात येऊन राहू लागले. सोलापूरची व्यापारी पेठ कर्नाटकातून आलेल्या

लिंगायत व्यापाऱ्यांच्या हाती गेली. त्यामुळेच शहरात लिंगायतांची वस्ती वाढू लागली. त्या अनुषंगाने मठ व मंदिराचीही निर्मिती झाली.[१२७]

सोलापूर शहर व जिल्ह्यात पंचमशील लिंगायत, गौडा लिंगायत, सदार, पंचाचारा लिंगायत हे शेती व्यवसाय करताना दिसून येतात. बनजिंगा व शिलवंत लिंगायत काही प्रमाणात शेती तर काही प्रमाणात व्यापार करताना दिसतात. लिंगायत ग्यानगा (तेली), लिंगायत गवळी, लिंगायत न्हावी, लिंगायत शिंपी इत्यादी लिंगायत जाती आपापले पारंपरिक व्यवसाय करतात. लिंगायतांमधील मागास जाती गावात पारंपरिक व्यवसाय करतात तर काही शहरात नोकरी करतात. आर्थिक उत्पादनाच्या साधनांवर पंचमशील लिंगायत, गौड लिंगायत, सदार, बनजिंगा या लिंगायतांचे वर्चस्व आहे.[१२८]

- **पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद**

सोलापूर शहरातील प्रसिध्द लिंगायत व्यापारी म्हणून ओळखले जाणारे पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांनी लिंगायत पंथांच्या प्रसार कार्यात भरीव कामगिरी केल्याचे दिसून येते. आप्पासाहेबांनी आपल्या समाजातील जंगम वर्गीयांना संस्कृतमधून धर्मशिक्षण घेता यावे, यासाठी सोलापूर शहरात चैत्र शु.।। प्रतिपदा, शके १८०० या दिवशी 'वारद संस्कृत पाठशाळे' ची स्थापना केली. या शाळेत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची सोय स्वतः आप्पासाहेबांनी केली होती.

लिंगायत समाजातील लोकांना आपल्या जातीचे व धर्माचे स्वरूप समजावे, त्यांच्यात उच्च आचार-विचार सुरू व्हावेत, कानडी न समजणाऱ्या महाराष्ट्रीय वीरशैवांना धर्मज्ञान व्हावे. यासाठी त्यांनी कानडी व संस्कृत भाषेतील अनेक धर्म ग्रंथांचे मराठी भाषेत भाषांतर करून ते ग्रंथ लोकांमध्ये मोफत वाटले.

'वीरशैव लिंगी ब्राह्मण' हा भाषांतर मालेतील ग्रंथापैकी एक ग्रंथ होय. तसेच बसववचन ग्रंथ, चन्नबसवेश्वर वचन ग्रंथ, प्रभुदेव वचन ग्रंथ, शिवयोगी रेणुकाचार्यांचा 'सिध्दांत शिखामणी' हा ग्रंथ दोन भागात प्रसिध्द केला. त्रिंबक गुरूनाथ काळे, कृष्णाजी नारायण जोशी आणि रंगाचार्य मुधोळकर इत्यादी मंडळीकडून आप्पासाहेबांनी कन्नड व संस्कृत ग्रंथांचे मराठी भाषेत भाषांतरे करवून घेतली. या ग्रंथ मालेतूनच मराठी लिंगायतास आपल्या धार्मिक आचार-विचारांची जाणीव झाली. आप्पासाहेब वारदांनी सन १९०७ मध्ये सोलापूर येथे पार पडलेल्या वीरशैव महासभेच्या अधिवेशनात

स्वागताध्यक्ष म्हणून भाषण केले तसेच सन १९०९ मध्ये बेल्हारी येथे पार पडलेल्या 'अखिल भारतीय वीरशैव महासभे' च्या पाचव्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. शिवाय सन १९१० मध्ये सातारा येथे पार पडलेल्या वीरशैव अधिवेशनात त्यांनी स्वागतपर भाषण केले.[१२९]

त्यांनी शहरातील जैन आणि ख्रिश्चनांना धार्मिक व सामाजिक कार्यासाठी आर्थिक सहकार्य करून सोलापूरात धार्मिक एकात्मता टिकविण्याचा प्रयत्न केला. अनेक वर्षांपासून शहरातील लिंगायत व जैन लोकांमध्ये सुरू असलेला वाद आप्पासाहेबांच्या प्रयत्नांमुळे पूर्णपणे नाहीसा झाला. त्यांच्या या धर्मसहिष्णु वृत्तीमुळेच 'पुण्यश्लोक' हे त्यांना मिळालेले विशेषण सार्थ ठरते.[१३०] सन १९८५ मध्ये सोलापूर वीरशैव लिंगायतांचे अधिवेशनावेळी डॉ. निलकंठराव कल्याणी यांनी महाराष्ट्रातील वीरशैवांच्या संघटनेची आवश्यकता असल्याचे सांगितले होते.[१३१] वीरशैवांनी शारीरिक श्रमाला महत्त्व देऊन स्त्रीचा सन्मान केला आहे, बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात विचार चिंतनात आणि साहित्यात स्त्रियांना समानसंधी दिली.[१३२]

## २.३ दत्त संप्रदाय

महाराष्ट्रातील दत्त संप्रदायाची महत्त्वाची ठिकाणे ही सोलापूर शहरापासून जवळ असल्याने या संप्रदायाचा प्रभाव सोलापूर शहर व परिसरावर पडलेला आहे. ब्रह्म, विष्णु व महेश या देवांचा संयुक्त अवतार म्हणून अनुसया पुत्र दत्तात्रय ओळखले जातात.[१३३]

या संप्रदायाचे उपास्यदैवत दत्त असल्याने दत्ताची उपासना शहरातील अनेक लोकांनी गुरू स्वरूपात सुरु केली. 'श्री गुरूदत्त' किंवा 'श्री गुरूदेवदत्त' हा या संप्रदायाचा जयघोष आहे. दत्त हे गुरूतत्त्वाचे प्रतिक असल्याने या संप्रदायात दत्ताला विशेष महत्त्व आहे. पुराणाच्या अंतिम संस्करणावेळी दत्तात्रयास दैवत्त्व प्राप्त झाले, तो अवधुत जोगी असल्याने अवधुत पंथात परमगुरू म्हणून ओळखला जातो. महानुभव पंचकृष्णात दत्ताचा समावेश आहे.[१३४]

सोलापूर शहरातील प्रसिध्द असलेले संत वाङ्मय अभ्यासक द. का. थावरे हे दत्त संप्रदायाचे वेगळेपण विशद करताना सांगतात की, 'दत्तात्रयाचा अवतार नऊ अवताराहून स्वतंत्र स्वरूपाचा आहे. या अवताराला प्रपंचाचीही घडी बसावी आणि परमार्थही करता यावा, अशी व्यवस्था

आहे'. परमार्थ हे शाश्वत धन असून ते लौकिक स्वरूपाचे आहे. केवळ प्रपंच हे मृत्यु लोकांचे साधन नाही तर प्रपंचाला परमार्थाची जोड हवी तरच जीवन कृतार्थतेच्या वाटेवर येते.[१३५]

दत्त संप्रदायाचा विस्तार हा विशेषतः गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या भागात पाहावयास मिळतो. महाराष्ट्रात नरसोबाची वाडी, औदुंबर आणि माहूर ही दत्त स्थाने प्रसिध्द आहेत. महाराष्ट्र, कर्नाटकच्या सीमा प्रदेशात सोलापूर शहरापासून ८० कि.मी. अंतरावर कर्नाटक राज्यात गाणगापूर हे दत्तात्रयाचे जागृत स्थान म्हणून ओळखले जाते.[१३६] दत्ताचे ठाणे असलेले गाणगापूर हे गांव आज कर्नाटकात असले तरी ते महाराष्ट्रातील विविध जाती-धर्माचे महत्त्वाचे श्रध्दास्थान व उपास्यदैवत आहे. शहर व जिल्ह्यातून अनेक दत्तभक्त दर गुरूवारी व पोर्णिमेस दत्तात्रयाच्या दर्शनासाठी जातात.

गाणगापूरच्या या दत्तात्रयापासून प्रेरणा घेऊन सोलापूर शहरात काही दत्तभक्तांनी दत्त मंदिरे व मठांची उभारणी केली. यामध्ये चौपाड दत्त मंदिर, घोंगडे वस्ती दत्त मंदिर, पूर्व विभाग दत्त मंदिर, नवी पेठ दत्त मंदिर इत्यादी मंदिराचा समावेश होतो. या मंदिरात गुरूवार, अमावस्या व पोर्णिमा या दिवशी दर्शनासाठी भक्त गर्दी करतात. त्याचबरोबर 'दत्त जयंती' हा उत्सव शहरातील दत्त मंदिराबरोबरच इतर मंदिरातूनही मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. रेल्वे स्टेशन परिसरात असलेले 'दंडवते महाराज गुहा' हे दत्त भक्तीचे महत्त्वाचे ठिकाण मानले आहे. भक्तीमार्गाच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी आणि लोकोध्दारासाठी दंडवते महाराजांनी सोलापूर येथे मठाची स्थापना केली.[१३७] दंडवते महाराज यांच्या सोलापूरातील 'दंडवते गुहा' या मठातून दत्त भक्तीचा प्रसार आजही मोठ्या प्रमाणात चालू असून त्यांच्या कार्याची परंपरा त्यांचे नातू सांभाळत आहेत.[१३८]

सोलापूर शहरापासून ३६ कि.मी. अंतरावर असलेले अक्कलकोट हे दत्त संप्रदायाचे महत्त्वाचे ठिकाण आहे. महाराष्ट्राच्या दत्तोपासनेच्या प्रचारात अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या चरित्र ग्रंथांमधून स्वामी समर्थांच्या उच्चकोटींच्या परमार्थिक अवधुत स्वरूप व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.[१३९]

सोलापूर शहर व जिल्ह्यातून अनेक दत्तभक्त दर गुरूवारी व पोर्णिमेस अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी जातात. शहरातील मठातून व विविध दत्ताच्या मंदिरातून दत्त संप्रदायाच्या विविध ग्रंथांची पारायणे होतात. त्यामध्ये सरस्वती गंगाधर यांनी लिहिलेला 'गुरूचरित्र'

हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.[१४०] या ग्रंथाबरोबर दत्त पुराण, दत्त महात्म्य, दत्तात्रय उपनिषध, अवधुत गीता या ग्रंथांची पारायणे होतात.[१४१]

## २.४ नाथ संप्रदाय

या पंथाचे आद्य प्रवर्तक आदिनाथ हा असून त्याचे मुळ स्थान अहमदनगर जिल्ह्यातील वृध्देश्वर वा म्हातार देवाचा डोंगर हे ठिकाण मानले जाते.[१४२] या पंथाला सिध्दपंथ, सिध्दमार्ग, योगमार्ग, योगसांप्रदाय, अवधुतपंथ, गोरखपंथ, कानफाटा संप्रदाय अशी विविध नांवे आहेत.[१४३] नाथ पंथामध्ये जोगी, अवधुत व कानफाटे हे तिन उपपंथ आहेत. जोगी हे संपूर्ण भारतभर पाहावयास मिळतात. भैरवास प्रमुख देवता मानणारे जोगी हे स्वत:जवळ असलेली शिंगी किंवा पुंगी वाजवून भोजन करतात. अवधुत हे कमी वस्त्र धारण करणारे व भिक्षेवर उदरनिर्वाह करणारे आहेत. कान विदिर्ण करून घेण्याच्या क्रियेमुळे कानफाटे हा त्यातील एक महत्त्वाचा उपपंथ आहे. लोकांना कानफाटे पंथाची दिक्षा देतानाच त्यांचे कान विदिर्ण करतात. विदिर्ण केलेल्या कानात या पंथाचे लोक कुंडले घालतात. कानफाटे हे गोरक्षनाथांच्या संप्रदायाचे प्रवर्तक किंवा संघटक मानतात.[१४४]

सोलापूर जिल्ह्यात बार्शी तालुक्यातील वैराग हे गाव संतनाथ या नाथपंथीय साधूच्या यात्रेसाठी प्रसिध्द असून श्रावण शुक्ल एकादशी ते वद्य प्रतिपदेपर्यंत वैराग या ठिकाणी मोठी यात्रा भरते. या यात्रेसाठी सोलापूर शहर व जिल्ह्याबाहेर अनेक ठिकाणाहून नाथपंथीय साधू व यात्रेकरून येतात. वैराग्य धारण केलेल्या नाथसिध्दांचा मेळावा फार पूर्वीपासून वैराग येथे भरत असल्याने या ठिकाणास वैराग्य - वैराग असे नांव पडल्याचे सांगितले जाते.[१४५]

सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेले चार काळभैरव शहराच्या चार दिशांना आहेत. त्यामध्ये पहिला पूर्व दिशेस सोलापूर सूतमिल येथे पडगंची मळ्यात, दुसरा पश्चिमेला बाळे या ठिकाणी, तिसरा दक्षिण दिशेचा काळभैरव देगांव येथे तर उत्तर दिशेला स्थापन केलेला चौथा काळभैरव तुळजापूर वेस येथे आहे, शहराच्या चारही दिशांना स्थापन केलेले हे काळभैरव नाथपंथीयांची श्रध्दास्थाने आहेत. या चारही दिशांच्या काळभैरवांच्या नित्यनैमित्तिक पूजा अर्चा होतात, पुजेच्यावेळी नाथांची आरती म्हटली जाते. रविवार हा काळभैरवाचा मानाचा वार असल्याने या दिवशी सकाळी व संध्याकाळी आरती केली जाते. 'कालाष्टमी' (कार्तिक वद्य अष्टमी) आणि काळभैरवाचा जन्मोत्सव या चारही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.[१४६]

सोलापूर शहर व परिसरात नाथ पंथीयांचे मठ व आश्रमही आहेत. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंडी तालुक्यातील श्री क्षेत्र इंचगिरी या ठिकाणी सन १९०३ मध्ये सद्‌गुरू समर्थ भाऊ महाराज यांनी 'श्री क्षेत्र इंचगिरी मठ' स्थापन केला. या मठाची एक उपशाखा सोलापूर शहरात नेहरू नगर या ठिकाणी 'श्री क्षेत्र इंचगिरी मठ' या नावाने सन १९४४ साली स्थापन केली. हा मठ सोलापूर शहर व परिसरातील नाथ पंथीयांचे श्रध्दास्थान आहे. नाथ सांप्रदायाच्या प्रसाराच्या उद्‌देशानेच सोलापूर शहर व परिसरात या मठाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत.[१४७] त्यामध्ये प्रभाकर महाराज मठ, सोलापूर, सिध्दरामेश्वर मठ, बाळे, जयप्पा महाराज मठ, बाळे, बंथनाळ मठ, आसरा रोड तसेच सेवालाल महाराज आश्रम, सेटलमेंट, सोलापूर याशिवाय देगांव, निलम नगर, तुळजापूर रोड, अक्कलकोट रोडवरील नागतळ्ळी इत्यादी शाखांचा समावेश होतो. या मठांच्याद्वारे नाथ पंथांचा प्रसार सोलापूर शहर व परिसरात होत असल्याचे दिसून येते.

## २.५ नागेश संप्रदाय

महानुभव व नागेश संप्रदायाचा प्रसार सोलापूर शहर व जिल्ह्यात म्हणावा तितक्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही. हा संप्रदाय सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ या गावाजवळ असलेल्या 'वडवळ' या गावाशी निगडीत असल्याने या संप्रदायाला 'वडवळ नागेश' अथवा 'वडवळसिध्द नागेश' संप्रदाय या नावानेही ओळखले जाते. चौदाव्या शतकामध्ये या संप्रदायाचा उगम झाला असून वीरशैव संप्रदायाचा प्रभाव या संप्रदायावर पडलाचे दिसून येते. या संप्रदायामध्ये नागेश तथा नागनाथ या सिध्द पुरूषाला गुरूस्थानी, आद्यस्थानी मानणारी एक परपंरा 'नागेश संप्रदाय' या नावाने सुपरिचित झाली आहे. हा संप्रदाय वीरशैवांप्रमाणे शिवोपासक असला तरी त्या संप्रदायात पुज्य मानलेल्या १२ ज्योतिर्लिंगांना हा संप्रदाय मानत नाही. अज्ञानसिध्दापासून नागेश संप्रदायाच्या साहित्य निर्मितीला सुरूवात होते. त्यांना नागेश संप्रदायाचे आद्यआचार्य म्हणून ओळखले जाते. त्यांचे मातामह हेगरस हे मोहोळ, जि. सोलापूर येथील राहणारे होते त्यांना नागनाथांचाच अनुग्रह झाल्याने पुढे ते नागनाथाचे वडवळ येथे स्थिर झाले. हेगरसची कन्या अहिल्येच्या पोटी अज्ञानसिध्दांचा जन्म झाला. कालांतरांनी त्यांनी नागनाथांच्या आदेशानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील नरेंद्रपूर (हातकणंगले) येथे अनेक ग्रंथांची रचना केली व मठ उभारले.[१४८]

या संप्रदायाचा प्रसार सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये झाल्याने प्रत्येक महिन्याच्या अमावस्येच्या दिवशी शहरातून व जिल्ह्यातून हजारो भक्तगण नागनाथांचे दर्शन घेण्यासाठी 'वडवळ' या गावी जातात. गुडी पाडव्याच्या अमावस्येला मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी लोक येथे गर्दी करतात. वडवळ हे गाव सोलापूरपासून जवळ असल्याने 'नागेश संप्रदायाच्या' प्रभावामुळेच सोलापूर शहरात डोणगांव रस्त्यावर एक नागनाथाचे मंदिर निर्माण झाले. या ठिकाणीही चैत्र शुध्द प्रतिपदा आणि प्रत्येक महिन्याच्या अमावस्या या दिवशी नागनाथाचे दर्शन घेण्यासाठी भक्तगण गर्दी करतात.

## २.६ इस्लाम धर्म

सोलापूर शहरात मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून आदिलशाही काळापासून ब्रिटिश काळापर्यंत धर्मप्रसार व व्यापाराच्या हेतूने अनेक सूफी संत व मुस्लिम लोक शहर व परिसरात येऊन स्थायिक झाले. त्यामध्ये मोगल, पठाण, मोमीन, शेख, पिरजादे इत्यादींचा समावेश होता. मोमीन हे शहरात विणकर व्यवसायात कार्यरत होते. सन १८८१ च्या जणगणनेनुसार मुस्लिमांची लोकसंख्या १४,७८० होती, तर सन १९११ मध्ये ती १८,७८४ इतकी झाली.[१४९]

इस्लाम धर्मात शिया व सुन्नी हे उपसंप्रदाय असून महमंद पैगंबरांना मानणारा सुन्नी हा पंथ होय. सिया पंथीय लोक कुराणातील काही भाग उस्मानने लिहिला असे समजून तेवढाच भाग वगळून कुराणाला मानतात. सुन्नी पंथीय लोकदिवसातून ५ वेळा तर सिया पंथी दिवसातून ३ वेळा आपला नमाज अदा करतात. सुन्नीमध्ये हनिफी, शफियी तर सियामध्ये नूरबक्षीया, अताइलाही, बोहरी, खोजा, इमामशाही, मोमीन, बारभाई, पिराई, सुफी, चिश्तिया, कादरिया, फिरदासिया, अहमदिया, लाहोरी इत्यादी उपपंथ आहेत. इस्लाममध्ये 'कुराण' आणि 'हदिस' हे ग्रंथ बहुमुल्य मानले जातात.[१५०]

तक्वा (धर्मश्रध्दा), इरव्लास (ईश्वरप्रित्यर्थ सद्वर्तन), तवक्कूल (ईश्वरावर पूर्ण विश्वास), सब्र (दृढनिश्चय, सहनशिलता, संतोष), शूक्र (ईश्वराविषयी कृतज्ञता) ही इस्लामची पाच अध्यात्मिक अधिष्ठाने आहेत. ही तत्त्वे माणसाच्या अध्यात्मिक प्रगतीचे टप्पे असून शहरातील मुस्लिम बांधव इस्लामची आचार तत्त्वे पाळतात. त्यामध्ये कलमा पठण करणे, नमाज पडणे, रोजा ठेवणे, जकात देणे आणि हज यात्रा करणे इत्यादींचा समावेश होतो.[१५१] शहरातील मुस्लिमांमध्ये सुगंधी द्रव्य विकणारे अत्तार, दुकानदारी करणारे बेडर, गुरूरगार्स, मणियार, टेलर, रंगारी, सुतारकाम करणारे व्यावसायिकही आहेत, तर बोहरा आणि मोमीन हे गुजरातमधून, लब्बा हे मलबार

विभागातून तर मुकरी हे म्हैसूर विभागातून आले आहेत. अफगाणी आणि पेठारी मुसलमान शहरात तट्टु विक्रीचा व्यवसाय करीत. शहरात असणारे अनेक मुस्लिम बांधव उर्दू भाषेबरोबर मराठी व कन्नड भाषा ही बोलतात. बरूरगार्स हे शहरातील गड्डा यात्रेच्या प्रसंगी शोभेची दारू उडवितात.[१५२]

शहरात मणियार संख्येने कमी असून ते कासाराचा व्यवसायाबरोबरच काच, लाखेच्या बांगड्या व लोखंडी धातूपासून बनविलेल्या वस्तूचीही विक्री करतात. बोहरी यांचा महत्त्वाचा व्यवसाय दुकानदारी असून ते गुजराती भाषेबरोबर उर्दूही बोलतात. शहरात बागवान, धोबी, गवंडी, मोमीन, पकाली, पेंढारी, पटवेगार, चिकलगार, तांबोळी इत्यादी उपजातींचे लोक राहतात. तेही मराठी, कन्नड, व उर्दू भाषा बोलतात आणि आपल्या आहारात शाकाहाराबरोबर मांसाहारही करतात. पुरूष पायघोळ सदरा व गोल टोपी घालतात तर स्त्रिया दुपट्टा, सलवार आणि पडदा पध्दतीचाही वापर करतात. बकरी ईद, रमजान, शब्बे बारात, पैगंबर जयंती, उननबी बराह इत्यादी महत्त्वाच्या सणाबरोबर हिंदुच्या सण व यात्रा उत्सवात सहभागी होतात.[१५३]

मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांची धार्मिक स्थळे निर्माण झालेली आहेत. आदिलशाहीकालीन काळीमशिद व जामा मशिदीत मोठ्या प्रमाणावर नमाज अदा केला जातो. मशिदी, दर्गे या धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी पंचकमिटीतर्फे पार पाडली जाते. जामा मशिदीला आदिलशाहीकाळात काही जमीन वतन म्हणून दान दिल्याचा उल्लेख आहे. मिळणाऱ्या उत्पन्नातून मशिदीचा दिवा बत्तीचा खर्च भागविला जाई.[१५४] अशाप्रकारे सोलापूर शहरातील मुस्लिमसमाज मशिदी, दर्गे आणि ईदगाहच्या माध्यमातून संघटित झालेला आहे. आपापल्या धार्मिक चालीरिती, रूढी, परंपरा जोपासत सोलापूर शहरात इतर धर्मीयांमध्ये मिसळतात.

## २.७ जैन धर्म

भारतातील प्राचीन धर्मांपैकी 'जैन धर्म' हा एक प्रमुख धर्म असून अहिंसा, संयम आणि तप ही जैन धर्माची महत्त्वाची तीन अंगे आहेत. 'अहिंसा' हा जैन धर्माचा केंद्रबिंदू असून अहिंसेचा पुरस्कार करणारा हा जगातील पहिला धर्म मानला जातो.[१५५] शरिर, इंद्रिय, मन, वाणी यांना संयमपूर्वक जिंकणाऱ्या व्यक्तींना 'जिन' म्हटले जाते. अशा जितेंद्रिय महापुरूषाची उपासना करणाऱ्या त्यांचे अनुयायीत्त्व स्वीकारणाऱ्या व्यक्तींना 'जैन' असे म्हटले जाते.[१५६] तसेच धर्माचे

निरूपण करणारा सर्वसंग परित्याग करून ज्याने शरिर, इंद्रिय, मन, वाणी यांना जिंकले आहे तो किंवा त्याच्या आदेशाचे आचरण करणारे ते 'जैन' होय.[१५७]

जैन धर्म हा तीर्थंकरधर्म आहे. 'तीर्थ' म्हणजे धर्म, धर्माचे प्रकटीकरण प्रवर्तन करणारे महापुरूष म्हणजे 'तीर्थंकर' होत.[१५८] देवाहून श्रेष्ठ असा जो धर्माध्यक्ष केवलज्ञानी संत म्हणजे 'तीर्थंकर' होय. अर्हत, सर्वज्ञ, वीतराग, केवली या संज्ञांनी जीवनयुक्त महापुरूषांचे वर्णन केले आहे.[१५९] विविध जन्मात प्रगती साधत मानव जन्मात ज्यांनी सर्वश्रेष्ठ ज्ञान प्राप्त केले व पूर्णत्त्व संपादन केले ते 'जिन' म्हणजेच 'तीर्थंकर' होय.[१६०]

जैन धर्मामध्ये उत्तम चारित्र्य, धर्मोपदेश व नैतिक सदाचारांचा आदर्श निर्माण करणारे चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ महापुरूष निर्माण झाले, अशी धर्मशास्त्राची श्रध्दा आहे. वर्धमान महावीरांच्या २५० वर्षापूर्वी होऊन गेलेल्या पाश्र्वनाथांनी अहिंसा, सत्य, अस्तेय व अपरिग्रह यावर आधारलेल्या 'चातुर्याम धर्म' विकसित करून 'श्रमण परंपरा' व 'श्रमण संघ' यांचे कार्य दृढमल केले.

### २.७.१ पंचव्रत व णमोकार मंत्र

जैन मुनींसाठी तसेच उपासक अथवा श्रावक यांच्यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व परिग्रह असे 'पंचव्रत' सांगितले आहे. हे पंचव्रत सोलापूर शहरातील जैन बांधव आचरण करतात. पंचव्रताबरोबर मोक्ष प्राप्तीचाही मार्ग या पंथात सांगितला आहे, तो मार्ग 'रत्नत्रयी' या नावाने ओळखला जातो.[१६१] शहरातील जैन बांधव णमोकार मंत्राचे नियमित पठण करतात. या मंत्रामध्ये एकाही तिर्थंकाराचे नांव दिसून येत नाही. या मंत्रातील ५ पदे सर्वोत्कृष्ट आदर्शाची प्रतिक असून प्रत्येक पदाची सुरूवात 'णमो' या शब्दाने होते. 'णमो' हा शब्द नमस्कार वाचक शब्द असल्याने या मंत्रास 'णमोकार' मंत्र म्हणतात.[१६२] मुळ अर्धमागधी भाषेत असलेला हा मंत्र तिर्थंकाराच्या दिव्यध्वनीमधून आलेला आहे.[१६३]

### २.७.२ शहरातील जैन धर्म

जैन धर्मीयांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'जातीव्यवस्था' हे होय. जैनसमाज अनेक जाती समुदायात विभागलेला आहे. 'जैन कम्युनिटी' या ग्रंथात भारतात जैन धर्मातील प्रमुख ८४ जातींचा

उल्लेख आढळतो.[१६४] सोलापूर शहर हे दक्षिण प्रांतातील जैनाचे विशेषतः हुमड समाजाचे माहेरघर समजले जाते. सुमारे ३०० वर्षांपूर्वी गुजरातमधील निरनिराळ्या भागातून हुमड दिगंबर जैन हे सोलापूर शहरात वास्तव्यास आले आणि वेगवेगळ्या उद्योगामध्ये सामील झाले. सातारा जिल्ह्यातील फलटण येथून आलेल्या जैन मारवाडी व जैन गुजरांची वस्ती शहरात ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणाला पुढील काळात 'फलटण गल्ली' या नावाने ओळखले जाऊ लागले.[१६५] सोलापूर शहरात जैनांचे सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थान महत्त्वाचे अहे. अनेक जैन मुनी दक्षिण भारतातील महत्त्वाच्या जैन धार्मिक ठिकाणांना भेटी देण्यासाठी जात असताना सोलापूर शहरात येऊनच मार्गस्थ होतात. या जैन मुनींच्या बरोबर मध्य प्रदेश व गुजरातमधून आलेले भक्तगण सोलापूर शहरात स्थायिक झाले. अशा भक्तगणांनी आराधना करण्यासाठी सोलापूर शहरात जैन मंदिरे निर्माण झाली.[१६६] सन १८८१ मध्ये सोलापूर शहरातील जैन लोकसंख्या ही १,३८५ होती.[१६७] सन १९११ मध्ये ती फक्त १,३१३ असल्याचे दिसून येते.[१६८] सन २०११ च्या जनगणनेनुसार शहरातील जैनांची लोकसंख्या ही १५,७८९ इतकी असल्याचे दिसून येते.[१६९]

शहरातील जैन धर्मीय समाज हा 'श्वेतांबर' आणि 'दिगंबर' या दोन महत्त्वाच्या पंथामध्ये विभागलेला आहे. श्वेतांबर पंथीय हे पांढरीशुभ्र वस्त्रे परिधान करतात तर, दिगंबर पंथीय हे नग्नावस्थेत असणाऱ्या साधूची पूजा करतात. शिवाय शहरातील जैन समाज हा अनेक उपजातींमध्ये विभागलेला आहे, यामध्ये उपाध्ये व पंचम हे होत. यातील कांही लोक शहरातील जैन मंदिरामध्ये पंडीत (पुजारी) म्हणून सेवा बजावतात तर काही लोक व्यापार व व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत. चतुर्थ जैन हे कासार व तांब्याची भांडी विकण्याच्या व्यवसायाबरोबरच कापड विक्रीचा व्यवसायही करीत असल्याचे दिसून येते. परंतु अलिकडच्या काळात शिक्षणामुळे त्यांच्या पारंपारिक व्यवसायामध्ये बदल झालेला आहे. वरील वर्गातून वैवाहिकसंबंध जोडले जात नाही, परंतु जेवणावळी मात्र एकत्र होतात.

जैनांचे धार्मिक विधी व मंदिरातील पूजा उपाध्ये करतात. उपाध्यांना स्वामी किंवा पंडीत या नावाने ओळखले जाते. मुख्य पुजाऱ्यास 'पट्टाचार्य स्वामी' या नावाने संबोधतात. जैन लोक आपल्या देवतेस 'गंधोधक' अथवा 'तीर्थांचा' अभिषेक करतात व प्रसंगी अग्निपुजाही केली जाते. त्यावेळी पुराण ऐकण्यासाठी शहरातील जैन बांधव जैन मंदिरात एकत्र जमतात. शहरातील जैन

धर्मीय बांधवांची धार्मिक स्थळे ही सामाजिक व धार्मिक दृष्टीकोनातून महत्त्वाची मानली जातात.[१७०] शहरातील जैन लोक मंदिरातील पूजा चार प्रकारे करतात. नित्यपूजा, अष्टमीहिकी पूजा, कल्पपूजा आणि पंचकल्याणी पूजा. नित्यपूजेमध्ये तीर्थकारांच्या मूर्तीवर जलाभिषेक केला जातो तर उत्सव काळात महाअभिषेक केला जातो. हा महाअभिषेक फुलातील मधाने अथवा पंचामृताने केला जातो. या पंचामृतामध्ये पाणी, ऊसाचा रस, साखर, केळी, लोणी, दुध, दही इत्यादी पदार्थांचा समावेश होतो. अष्टमीहिकी पूजा आषाढी पोर्णिमा, कार्तिक पोर्णिमा आणि फाल्गुन पोर्णिमेस होते. प्रत्येक चांद्रमासास, चतुर्थी, अष्टमी, एकादशी, चतुर्दशी, पोर्णिमा, अमावस्या असा दहा दिवसांचा जैन बांधव उपवास करतात व जेष्ठ शुध्द पंचमीला श्रुतदेवीची पूजा करतात. शहरातील जैन मंदिरातून बाहुबली, धर्मचक्र, परमेष्ठी, अरंहत, सिध्दाहास, आचार्य, उपाध्याय आणि साधू यांच्याही मूर्तीची पूजा केली जाते.[१७१]

भाद्रपद उत्सव हा विशेष करून शहरातील जैन बांधवांचा महत्त्वाचा उत्सव असतो. हा उत्सव भाद्रपद शुक्ल ५ मितीस सुरू होऊन भाद्रपद शुक्ल १५ या दिवशी संपतो. या दहा दिवसांच्या कालावधीत सर्व जैन लोक व्यापार व व्यवसाय बंद ठेवून पूजा, शास्त्र, स्वाध्याय, व्रत इत्यादींचे आचरण करतात. विविध जैन मंदिरात रोषणाई करून धर्मोपदेशाची व्याख्याने, किर्तने, पुराणे इत्यादी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दिवसभरातील 'श्री' चे पूजा-अभिषेक संपल्यानंतर जैनांचे मुख्य शास्त्र (तत्त्वार्थ) याचा अर्थ सांगितला जातो. यासाठी शहरातील विविध जैन मंदिरात आचार्य व मुनींचे आगमन होते.[१७२] या जैन मुनींमध्ये ऐल्लक पन्नालाल, आचार्य शांतीसागर महाराज, वृषभसागर महाराज, तरूणसागर महाराज इत्यादींचा समावेश होता.[१७३]

भाद्रपद शुक्ल चतुर्दशीच्या दोन प्रहरी जैन मंदिरात सामग्रींचा व कुंभाचा चढावा होतो. भाद्रपद वद्य प्रतिपदा या दिवशी जलयात्रेनिमित्त पालखी मिरवणुक निघते. सन १९१५ मध्ये जलयात्रेच्या निमित्ताने सोलापूरात काशीचे जैन धर्मीय गुरूवर्य पन्नालाल बाकळी, बाळ पंडीत, प्रसिध्द किर्तनकार तात्या केशव चोपडे, काठेवाडचे शिवाजी देवश्री इत्यादी मंडळी प्रवचन, व्याख्यान व पुराणे इत्यादी कार्यक्रमांसाठी आले होते. त्यावेळी बुबणे जैन मंदिरात जैन पाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी तत्त्वार्थाचा अर्थ सांगीतला. याच मंदिरात मुंबई निवासी श्राविकाश्रमातील कुमारिका श्रीदेवी जैन यांनी स्त्रियांना धर्मोपदेश केला. यावेळी या सर्व महोत्सवाची व्यवस्था शहरातील

'सम्यकवर्धिनी' सभेच्या देखरेखीखाली करण्यात आली होती.[१७४] सण व उत्सव साजरे करण्याबरोबर सोलापूर शहरातील जैन बांधव अनेक जैन धार्मिक स्थळांच्या तीर्थाटनासाठी जातात. दक्षिण काठेवाडातील गिरनार येथील नेमीश्वरा (नेमिनाथ), पावापुरा, राजगृह, वर्धमानस्वामी तसेच पार्श्वनाथ डोंगर गोमटेश्वर (श्रवणबेळगोळ), मुद्दिबडी, बनारस इत्यादी तीर्थस्थानांना भेटी देऊन अनेक ठिकाणी धार्मिक कार्यासाठी आर्थिक सहाय्य देखील शहरातील जैन बांधव करतात.[१७५]

### २.७.३ सल्लेखना व विविध संस्कार

'सल्लेखना' हा शब्द संपूर्णपणे जैनाचार प्रक्रियेचा पारिभाषिक शब्द आहे. 'सत्' आणि 'लेखना' अशा दोन शब्दांनी मिळून 'सल्लेखना' हा शब्द तयार होतो. 'सत्' म्हणजे प्रशंसनीय, चांगले, योग्य, यथोचित आणि 'लेखना' म्हणजे कृश करणे. 'रत्नकरंड श्रावकाचार' या ग्रंथात समंतभद्राचार्य यांनी योग्य कारण उपस्थित झाल्यावर धर्माय रत्नत्रय धर्माच्या रक्षणासाठी विधीपूर्वक शरीराचा त्याग करणे म्हणजेच 'सल्लेखना' होय असे सांगितले आहे.[१७६]

सोलापूर शहरात अशा प्रकारे सल्लेखना करणाऱ्या अनेक व्यक्ती होऊन गेल्या. त्यमध्ये क्षु-आदिसागर, रामायणक, क्षु-राजुलमतीजी माता, क्षु-आनंतमतीजी माताजी, क्षु-सुशलमती माताजी, प. पद्मश्री सुमतीबाई शहा इत्यादींचा समावेश होतो.[१७७] सल्लेखनाबद्दल स्वामी समंतभद्राचार्यांचा एक श्लोक प्रसिध्द आहे.[१७८] श्रावक आणि मुनी दोघेही सल्लेखना धारण करू शकतात. सल्लेखना धारण करणाऱ्या साधकाने मृत्यु हा महोत्सव समजून तो यथाविधी पार पाडावा ही भावना मनात रूजवावी म्हणजे विकल्प, वेदना यांचा अंश कमी होऊन निराबाध 'सल्लेखना' पार पडते. सल्लेखना व दिगंबरत्त्व याबद्दल महात्मा गांधीजी म्हणतात की, "गरजांची कपात व आत्मिक गुणांची वाढ म्हणजेच ऐहिक पदार्थांवरील निर्ममत्त्व हीच ती सल्लेखना आणि हेच ते दिगंबरत्त्व." [१७९]

जैन धर्मात संस्कारांना विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्यात वास्तव्य करीत असलेल्या जैन समाजाचे संस्कार, विधी व रितीरिवाज सर्वत्र सारखे नाहीत. दिगंबर व श्वेतांबर पंथीयांमध्ये काही संस्कार वेगळे तर, काही संस्कार एकसारखे आहेत. दिगंबरांच्या दृष्टीने श्रावकाला 'आदिपुराण' या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे ५३ संस्कारातून आपले जीवन व्यतीत करावे लागते. 'आचारदिनकर' या ग्रंथात श्वेतांबर पंथीयांसाठी १६ संस्कार सांगितलेले आहेत.[१८०] या संस्काराबरोबरच पयुर्षणपर्व, चातुर्मास, महावीर जयंती, चैत्रपोर्णिमा, वर्षप्रतिपदा, भाद्रपद उत्सव,

अष्टमी, एकादशी, चतुर्थी, प्रत्येक महिन्याची पार्णिमा व अमावस्या, जेष्ठ शुध्द पंचमी इत्यादी महत्त्वाचे सण व उत्सव सोलापूरातील जैन धर्मीय लोक साजरे करतात.[१८१]

अलिकडच्या काळात जैन धर्माविषयी माहिती सांगणारे अनेक ग्रंथ निर्माण झाले आहेत. हे ग्रंथ संस्कृत तसेच हिंदी व इंग्रजी भाषांमधून पाहावयास मिळतात. सोलापूर शहरातील अनेक जैन लेखकांनी अशा जैन ग्रंथांची निर्मिती केलेली आहे. त्यामध्ये पं. पद्मश्री सुमतीबाई शहा यांनी मराठी, संस्कृत तसेच हिंदी भाषेतून जैन धर्म ग्रंथांचे लिखाण केलेले आहे. त्यामध्ये 'पुण्यार्ध्य' हा जैन ज्ञानकोश अत्यंत महत्त्वाचा असून त्यात जैन धर्मीयांचे आचार-विचार, सण-समारंभ, व्रत-वैकल्ये तसेच उत्पत्ती इत्यादी अनेक विषयांची माहिती मिळते. सुमतीबाई यांनी जैन दृष्टीकोनातून लिहिलेले रामायण, आदिगीता हे खंडकाव्य, समयसार, महापुराण, भावगीता, षट्खण्डागम इत्यादी ग्रंथांचे लिखाण केले. शहरातील महावीर गांधी, सुरेखा शहा, विद्युलता शहा यानीही जैन साहित्याची निर्मिती केलेली आहे.

## २.८ बौध्द धर्म

अस्पृश्यांना धार्मिक विषमतेतून गुलाम बनविणाऱ्या हिंदू धर्माबद्दलचा असंतोष व्यक्त करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले. बौध्दीक अभिसरणातून त्यांनी बौध्द धर्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यापूर्वीही काही समाज सुधारकांनी अस्पृश्य उध्दाराचे कार्य केले. त्यामध्ये बाबा पद्मणजी, ज्योतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, भिकोबा दादा चव्हाण, सर रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, वी. रा. शिंदे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज यासारख्या समाज सुधारकांचा त्यात समावेश होतो. दलित समाजाच्या उध्दारासाठी सुरू करण्यात आलेल्या या कार्याला व्यापक चळवळीचे स्वरूप प्राप्त करून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांच्याच अध्यक्षतेखाली सन १९२७ साली सोलापूर शहरात २६ व २७ नोव्हेंबर या दिवशी 'सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषदेचे' दुसरे अधिवेशन पार पडले. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य बांधवांना उद्देशून भाषण केले होते.[१८२] यामध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना खुले व्हावे व महार वतनात सुधारणा होऊन महार वतनदारांची आर्थिक स्थिती कशी सुधारता येईल, याबद्दलचे विचार मांडले होते.

२५ मे १९२९ रोजी के. के. सकट यांच्या अध्यक्षस्थतेखाली सोलापूर शहरात मातंग समाजाची जाहीर सभा झाली. या मातंग सभेस शहरातील अनेक स्पृश्य लोक हजर होते. मुरारजी पेठेतील मांगवाड्यात भरलेल्या या सभेत झालेल्या ठरावानुसार मातंग समाजातील रखवालदारीचे काम करणाऱ्या मातंगाना पडीक जमिन लागवडीसाठी देणे, सुशिक्षितांना नगरपालिकेत नोकऱ्या द्याव्यात, त्यांच्या राहत्या घरावरील कर माफ करावा, मातंग वस्तीत पाण्याची, दिवाबत्तीची व शौचकुपाची सोय करावी, सिध्देश्वर मंदिराजवळ मातंग धर्माशाळा बांधण्यासाठी नगरपालिकेने आर्थिक मदत करावी असे ठरले.[१८३] अशा प्रकारे शहरात अनेक सभा व अधिवेशनांद्वारे अस्पृश्य समाजाच्या धार्मिक व सामाजिक हक्कांबाबत जागृती करण्याचा प्रयत्न झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अस्पृश्य बांधवांना धार्मिक हक्क मिळावेत आणि त्यांना सर्व मंदिरातून प्रवेश मिळावा म्हणून अनेक ठिकाणी मंदिर प्रवेशाची चळवळ उभी करण्यात आली होती. त्याचाच परिणाम म्हणून सन १९३१ मध्ये सोलापूर शहरातील थोरल्या महारवाड्यात पुणे येथील अस्पृश्यांचे पुढारी नथोजी राजभोज यांच्या अध्यक्षतेखाली एक जाहीर सभा झाली. या सभेत सोलापूरचे सिध्देश्वर मंदिर आणि पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यात यावे, असा ठराव पास करण्यात आला. याचाच परिणाम म्हणजे सन १९३२ मध्ये सिध्दरामेश्वर देवालय आणि देवळाभोवती असणारा तलाव अस्पृश्यांसाठी खुला करण्यात आला.[१८४]

सन १९३६ मध्ये सोलापूर शहरात अस्पृश्य परिषदेचे पाचवे अधिवेशन संपन्न झाले. जातीय विषमता नष्ट होऊन समता प्रस्थापित व्हावी यासाठी बनसोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिवेशनानंतर होळी दिवशी प्रतिकात्मक विषमतेची होळी केली.[१८५] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईमध्ये 'समाज समता मंच' नावाची संस्था स्थापन करून या संस्थेतर्फे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी स्पृश्य-अस्पृश्य यांच्या सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणले. त्यावेळी वरिष्ठ वर्णातील नेत्यांनी जाती संस्थेचे निर्बंध दूर सारून समता व बंधुभाव या तत्त्वांचा आम्ही पाठपुरावा करीत आहोत, असे म्हटले.[१८६] अशा प्रकारचा सहभोजनाचा कार्यक्रम सोलापूर शहरात २४ मे १९३६ रोजी हायर प्रायमरी स्कुलच्या इमारतीत शंकरराव पटवर्धन यांनी घडवून आणला. झुणका-भाकर सहभोजनाच्या या कार्यक्रमास सुमारे ८०० च्या वर स्पृश्य-अस्पृश्य बांधव हजर होते. महाराष्ट्रातील सहभोजनाच्या बाबतीत सोलापूर हे दुसऱ्या क्रमांकाचे शहर ठरले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'सोलापूर समाचार' चे

संपादक बाबुराव जक्कल होते. कोल्हापूरच्या 'सत्यवादी' पत्राचे संपादक अनंतराव आणि बाळासाहेब पाटील, सोलापूर येथील गद्रे लक्ष्मी मंदिराचे प्रमुख श्री. गद्रे, पटवर्धन, देशमुख, अंदुरकर इत्यादी मान्यवर मंडळीही हजर होती. या सहभोजनाच्या निमित्ताने सोलापूरचे सुप्रसिध्द कवी कुंजविहारी यांच्या कविता गायनाचा कार्यक्रमही झाला होता.[१८७] अशा प्रकारे सोलापूर शहरात स्वातंत्र्य पूर्व काळापासून स्पृश्य-अस्पृश्यांचे संबंध हे स्नेहाचे व सामोपचाराचे राहिले.

अस्पृश्य समाजात अनेक धर्मभोळ्या कल्पना व रूढी-परंपरा अस्तित्त्वात होत्या. त्यापैकी 'पोतराज' ही रूढी अत्यंत निर्दयतेची समजली जाते. पोतराज हा पांपरिक व सामाजिक प्रथेचा भाग असून तो मरीआईचा उपासक व भक्त आहे. अशा या पांपरिक रूढीचा नायनाट करण्यासाठी शहरातील पोतराजांनी प्रयत्न केले होते. यासाठी आंबेडकर तरूण सेवादलाच्या मार्फत शहरात थोरल्या महारवाड्यात १९ जुलै १९३६ रोजी एक सभा घेऊन या सभेत पोतराजासारखे नृत्य करून उपजीविका करणाऱ्या अनेकांनी यापुढे आम्ही पोतराजकी करणार नाही, असे जाहीर करून १५ ते २० पोतराजांनी ही परंपरा सोडण्याचा संकल्प करुन डोक्यावरील जटा काढून टाकल्या. यामध्ये दादाराम पोतराज, पांडुरंग भालेराव, लक्ष्मण बाळु पोतराज, कळसप्पा पोतराज इत्यादींचा समावेश होतो.[१८८]

शहरात बौध्द समाज बांधवांच्या जवळपास १९ ते २० वस्त्या आहेत. थोरला महारवाडा म्हणून परिचित असलेला हा भाग सध्या मिलींद नगर या नावाने ओळखला जातो. जी. एम. चौक, सम्राट चौक, मड्डी वस्ती, खणी वस्ती, गौतम नगर, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, बुधवार पेठ, न्यु. बुधवार पेठ, आंबेडकर हौसिंग सोसायटी, सेटलमेंट, फॉरेस्ट, हब्बु वस्ती, हौसे वस्ती, मोटे वस्ती, थोबडे वस्ती, रमाबाई नगर, माशाळकर वस्ती, मुकुंद नगर तसेच धाकटा महारवाडा (धाकटा राजवाडा), कुंभार वेस ह्या भागात बौध्द धर्मीयांची मोठया प्रमाणात वस्ती असल्याचे दिसून येते.[१८९]

बौध्द धर्मात नित्य-नैमित्तिक विधींना 'चर्या' म्हटले जाते. या नित्य आचारात चैत्यवंदना, बोधिवंदना, त्रिशरण पंचशील, अष्टशील, परित्राण पाठ इत्यादींचा समावेश होतो. बौध्द धर्मीयांमध्ये अमावस्या, पोर्णिमा, अष्टमी या दिवशी 'उपोसथ' (उपवास) धारण करतात. या काळात अष्टांग मार्गाचा अवलंब करून ब्रह्मचर्य व्रत्ताचे पालन केले जाते. याचबरोबर 'वर्षावास' (चातुर्मास) यासही बौध्द धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. या आचारांबरोबरच महापरिनिर्वाण दिन, बुध्द जयंती, आषाढी

पोर्णिमा, भाद्रपद पोर्णिमा इत्यादी उत्सव शहरातील बौध्द धर्मीय लोक आनंदाने साजरे करतात.[११०] शहरात बुध्द जयंती, धम्मचक्र प्रवर्तन दिन, विजयादशमी हे सण मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. यादिवशी शहरातील लाखो बौध्द बांधव पांढरी वस्त्रे धारण करून बुध्द मूर्तीची मिरवणूक काढून 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' साजरा करतात. विजयादशमी दिनाचे महत्त्व ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्म स्वीकारून दलित समाजाला स्वाभिमानाचा मार्ग दाखविला, त्याची आठवण म्हणून या दिवशी शहरातील बौध्द बांधव आपल्या घरावर 'धम्मध्वज' लावतात आणि शुध्द मनाने त्रिसरण-पंचशील ग्रहण करून बौध्द धर्माची शिकवण अंगीकारतात.

धम्मचक्र प्रवर्तना दिवशी सोलापूर शहरात सामुहिक बुध्द वंदना होते आणि नंतर सत्र पठणाचा कार्यक्रम होऊन सकाळी ११ वाजता रमाबाई आंबेडकरनगर येथून मिरवणुकीस सुरूवात होते. या मिरवणुकीत बौध्द धर्मीय अबाल-वृध्दांचा समावेश असतो. शहरातील सामाजिक संस्था, तरूण मंडळाकडून मिरवणुकीत लेझिम, झांज, टिपऱ्या आदि खेळ सादर केले जातात. तसेच पथनाट्य, पर्यावरण बचाव, महिलांवर होणारे अन्याय-अत्याचार, स्त्रीभ्रूण हत्या आदि देखावेही सादर करून लोकजागृती केली जाते. बुध्द मिरवणुकीबरोबर शहरात पार्क चौकात असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयास अभिवादन करण्यात येते.[१११]

शहरात एकूण ७५ बौध्द विहारे असून बुधवार पेठ, न्यु बुधवार पेठ हे त्याचे केंद्रबिंदू आहे. या बौध्द विहाराच्या माध्यमातून भन्तेंचे मार्गदर्शन, श्रामणेर शिबीर, महिला उपासिका शिबीर, बालसंस्कार शिबीर, केंद्रीय शिक्षक-शिक्षिका शिबीर, बौध्दाचार्य शिबीर इत्यादी २४ प्रकारची शिबीरे बौध्द महासभेच्या माध्यमातून घेतली जातात. बुधवार पेठेतील मिलींद नगर बौध्द विहार, न्यु बुधवार पेठ येथील बौध्दांचा दानमय बौध्द विहार, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी येथील सिध्दार्थ विहार तसेच विजापूर नाका, कुमठा नाका, मड्डी वस्ती, खणी वस्ती, फॉरेस्ट, रमाबाई झोपडपट्टी इत्यादी ठिकाणी असणाऱ्या बौध्द विहारांमध्ये दररोज बुध्द वंदना घेतली जाते.

## २.९ पारशी धर्म

पारशी समाज हा मूळचा इराणचा असून, या समाजाचे काही लोक सोलापूर शहरात स्थायिक झालेले आहेत. शहरात या समाजाची लोकसंख्या कमी असली तरी, प्रामुख्याने या समाजातील लोक दुकानदारी, व्यापारी आणि बांधकाम व्यावसायिक म्हणून कार्य करीत आहेत. सन

१८८१ मधील जनगणनेनुसार शहरातील पारशी लोकांची सेख्या केवळ १२७ होती.[१९२] तर सन १९११ मध्ये त्यांची संख्या ३३७ इतकी झाली.[१९३] अलिकडील काळात शिक्षण, उद्योग व व्यवसायामुळे शहरातील पारशी लोक मुंबई, पुणे येथे जाऊन स्थायिक झाले त्यामुळे सध्या ही संख्या ५० ते ६० वर येऊन ठेपली आहे.[१९४]

सोलापूर शहरात पारशी लोकांची संख्या कमी असली तरी त्यांनी शहरातील लष्कर भागात १७५ वर्षांपूर्वी अग्यारी या धार्मिक स्थळाची स्थापना केली. पतेती व नवरोझ हे पारशी बांधवांचे धार्मिक सण आहेत.[१९५] पारशी बांधव पतेती सणादिवशी नवीन कपडे परिधान करून अग्यारीत येतात. पांढऱ्या रंगाचा रूमाल महिला डोक्याला बांधतात आणि आपल्या कुंटुंबियांसह अग्यारीत येऊन प्रार्थना करतात. या सणाच्या निमित्ताने पारशी बांधवांच्या घरी गोड खीर, शेवई व इतर पदार्थ तयार करून एकमेकांना आलिंगन देऊन नवीन वर्षाचे स्वागत करतात. लष्कर भागातील अग्यारीत पारशी लोकांचा धर्मगुरू दररोज पाचवेळा प्रार्थना व पूजा करतो. अग्यारीत वर्षभर अग्नि तेवत ठेवला जातो. पतेती या सणानिमित्त पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांची पूजा करण्यात येते.[१९६] शहरातील अग्यारीचे व्यवस्थापन पंचकमिटीमार्फत केले जाते.[१९७] सध्या या अग्यारित 'मोबेद' (धर्मगुरू) म्हणून जाल दाबर हे सेवा करीत आहेत.

पारशी समाजात विवाह करणे सक्तीचे असून, संन्यास व ब्रह्मचर्य निषीध्द मानले आहे. या समाजातील लोक जवळच्या नात्यातील विवाहाला अधिक पसंती देतात. त्यामुळे त्यांच्यात चुलत बहिण-भावाचा विवाह लावून दिला जातो. लग्न समारंभ हा वधूच्या घरी सायंकाळी केला जातो त्यावेळी वधूकडील मंडळी वरगृही जाऊन वराला वाजत गाजत घेऊन येतात. लग्न मंडपात वधू-वरांना समोरासमोर बसविले जाते आणि त्यांच्यात अंतरपाट धरला जातो. या अंतरपाटाच्या वस्त्राखालून दोघांचे उजवे हात एकत्र जुळवून ते सुताने बांधून त्याच सुताचे सात पदर आणि एक वस्त्र वर-वधूभोवती गुंडाळले जाते, व वस्त्राला गाठ मारली जाते, या गाठीला 'विवाहग्रंथी' असे म्हणतात. त्यानंतर अग्नित धूप टाकतात आणि नंतर वधू-वर एकमेकांच्या मस्तकावर अक्षता टाकतात. पारशी पुरूष एक पत्नी जीवंत असताना दुसरा विवाह करू शकत नाही. मात्र या समाजात पुनर्विवाह मान्य आहे.[१९८]

पारशी धर्मियामध्ये अंत्यसंस्कार करावयाच्या ठिकाणाला 'शांतीस्थान' म्हणतात. हे लोक मृतदेहाचे दहण किंवा दफन करत नाहीत, तर मृतदेह खास बनविलेल्या विहीरीमध्ये टाकतात. हा मृतदेह पक्षांना दिसेल अशी विहीरीची रचना असते.[१९९] मृतशरीराचा प्रत्येक भाग पक्षांच्या खाण्यात यावा हा यामागील उद्देश असतो. यातून या लोकांची उपयुक्ततावादाची भावना दिसून येते.[२००]

## २.१० ख्रिश्चन धर्म

सन १८६२ मध्ये आद्य मिशनरी रेव्ह आणि चार्लस् हार्डिंग हे सोलापूरात ख्रिश्चन धर्माच्या प्रसार कार्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या इतर सहकार्यांबरोबर सोलापूर शहर व सभोवतालच्या भागाचा दौरा करुन सन १८६३ मध्ये बार्शी व कुंभारी येथे शाळा स्थापन केली. सन १८६४ मध्ये सोलापूर शहरात 'पहिल्या ख्रिस्त मंडळीची' स्थापना करून त्यांनी आपल्या धर्मप्रसाराच्या कार्याला सुरूवात केली. शैक्षणिक सुधारणा, दीन-दुबळ्यांची सेवा, कनिष्ठ लोकांना आर्थिक लाभ व सामाजिक प्रतिष्ठा, जाती व्यवस्थेचा नाश करणे, स्त्रियांचा दर्जा उंचावणे, कुष्ठरोग्यांची सेवा करणे इत्यादी कल्याणकारी योजना राबवून मिशनऱ्यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्याचे सूत्र राबविले. यामुळेच सन १८६६ साली कुंभारी येथील ब्राह्मण जातीच्या केसकर बंधूनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला आणि ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या कार्याची सुरूवात केली.[२०१]

सन १८७७ मधील दुष्काळाच्या वेळी सोलापूर शहरात ख्रिश्चन मिशनने गरीबांना अन्नदान करणे, कपडे पुरविणे, रोग्यांना मोफत औषधोपचार करणे, अनाथ मुलांचे संगोपन करणे यासाठी अनाथालयाची स्थापना केली. दुष्काळाच्या वेळी सुमारे ३००० मुलांचे पालनपोषण केले. त्याचबरोबर शहरात डॉ. ओगडेन आणि डॉ. केसकर यांनी महारोग्यांकरीता 'विश्रांतपूरा' नावाची संस्था स्थापन केली होती. त्यामुळे सोलापूर शहर व परिसरात ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या कार्याला चांगलेच बळ मिळून शहरात विविध ख्रिश्चन मिशनरी संस्थांची स्थापना झाली. त्यामध्ये जोसेफाईन किंडरगार्टन शाळा, वोरोनोका मुलींची शाळा, ॲरोव्हर्नाक्युलर स्कुल याच बरोबर उमेदपूर (सध्याचे सेटलमेंट, रामवाडी विभाग) ही औद्योगिक वसाहत इत्यादी संस्थांचा समावेश होतो.[२०२]

सन १८७२ मध्ये शहरात ख्रिश्चनांची लोकसंख्या २३९ इतकी होती, सन १८८१ मध्ये ही संख्या वाढत जावून ५११ वर गेली. सन १९०१ मध्ये १६३१ इतकी झाली.[२०३] सन १९७१ मध्ये ख्रिश्चन धर्मीय स्त्रियांची संख्या २२७६ आणि पुरूषांची संख्या २४१८ इतकी होती.[२०४] पुढे त्यामध्ये वाढ

होऊन ही लोकसंख्या सन २०११ मध्ये ८३३४ इतकी झाली. शहरात असणारे ख्रिश्चन लोक थोड्याफार प्रमाणात युरोपियन होते. या युरोपियनांमध्ये सैनिकांचा समावेश होता, तर काही युरेशियन आणि काही अमेरिकन मराठी मिशनकडून धर्मांतरीत  झालेले ख्रिश्चन होते. सोलापूरात या मिशनने सन १८६२ मध्ये आपल्या कार्याला सुरूवात केली होती. त्यावेळी त्यांनी ख्रिश्चन धर्म प्रसारासाठी शाळा स्थापनेबरोबरच ख्रिश्चन धर्माबद्दल माहिती देणारी काही पुस्तके छापून ती लोकांपर्यंत पोहोचहून आपल्या धर्मांचा प्रसार केला. धर्मांतरीत झालेल्या ख्रिश्चनांनी स्वतःचे नांव व आडनावात बदल केला नाही. परंतु आपल्या मुला मुलींची नांवे त्यांनी ख्रिश्चन पध्दतीने ठेवली. सध्या सोलापूरात असणारे अनेक ख्रिश्चन हे धर्मांतरीत ख्रिश्चन असल्याने ते आपल्या जुन्या धर्माप्रमाणे रूढी, परंपरा, चालीरितीनुसारच राहत असल्याचे दिसून येते.[२०५] शहरातील ख्रिश्चन धर्मियांमध्ये रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट हे दोन प्रमुख पंथ असून मेथॉडिस्ट, इस्टर्न ऑर्थेडिक्स् इत्यादी उपपंथही दिसून येतात. प्रत्येक पंथीय व उपपंथीयांचे शहरात वेगवेगळे चर्चस् असून दर रविवारी ते आपापल्या चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करतात.

ख्रिस्ती धर्माचे धार्मिक स्थळ असणाऱ्या 'चर्च' ने धार्मिक, राजकीय तसेच सामाजिक सुधारणेच्या चळवळीत महत्त्वाची भूमिका पार पाडली. शहरातील सेंट जोसेफ ही शाळा रोमन कॅथॉलिक चर्चशी जोडलेली आहे.[२०६] तसेच सोलापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने सिध्देश्वर तलावातील अतिरिक्त पाणी रस्त्यावर येऊ नये म्हणून  गणपती घाटाच्या बाजूस एक संरक्षक भिंत बांधली यासाठी अमेरिकन मराठी मिशनने आर्थिक मदत केल्याचा उल्लेख सापडतो.[२०७] नाताळदिवशी शहरातील चर्चमधून प्रार्थना आयोजित केली जाते. यावेळी सर्व ख्रिस्त बांधव प्रार्थनेसाठी हजर राहतात. ख्रिस्ती धर्माचा 'बायबल' या पवित्र धर्मग्रंथामधील तत्त्वानुसार शहरातील ख्रिस्ती समाज धर्माचरण करताना दिसून येतो. रविवार हा दिवश पवित्र मानला गेल्याने या दिवशी चर्चमधून सामुहिक प्रार्थना, उपासना, इसस्तवन आणि दानधर्म केला जातो.[२०८]

## २.११ शीख धर्म

सोलापूर शहरामध्ये लोकसंख्येने कमी असणारे शीख धर्मीय लोक पाकिस्तानमधील सिंध प्रांतातून आलेले आहेत. त्यामुळे हे सिंधी शीख म्हणून ओळखले जातात. हे सिंधी लोक आपल्या व्यवसायानिमित्त सोलापूर शहरात स्थायिक झाले.[२०९] फाळणीनंतर अनेक शीख कुटुंबे पंजाब,

दिल्ली, हरियाणा तसेच महाराष्ट्रातील अनेक शहरात ही शीख धर्मीय कुटुंबे स्थायिक झाली.[२१०] गुरूनानक हे शीख धर्मीयांचे आद्य प्रवर्तक होत. प्रारंभी भक्तीमार्गी असलेला आणि पुढील काळात क्षात्रधर्मी बनलेला, पंजाबमध्ये उदयास आलेला हा शीख धर्म महत्त्वाचा धर्म मानला जातो. गुरूनानकांनी एकेश्वर धर्माची स्थापना केली, त्यालाच 'शीख सांप्रदाय' असे नांव मिळाले.[२११] गुरूनानकांच्या शिष्यांना 'शीख' म्हटले जाते, 'शीख' या शब्दाचा अर्थ 'शिष्य' असा होतो. पंजाबमध्ये गुरूमुखी भाषेत शिष्याला 'शिख्ख' (सिक्ख) असे म्हणतात. 'शीख धर्म' हा गुरूपरंपरा मानणारा धर्म आहे. 'गुरूग्रंथसाहेब' हा शीखांचा धर्मग्रंथ महत्त्वाचा असून या ग्रंथाच्या उपदेशाप्रमाणे शीख लोक धर्माचरण करतात.[२१२]

'गुरूद्वार' हे शीख धर्माचे पवित्र स्थळ असून, ते ईश्वराचे निवासस्थान नसून ईश्वराच्या निवासस्थानाकडे जाण्याचा मार्ग आहे. ईश्वराच्या उपासनेने ईश्वराच्या निवासाचा दरवाजा उघडला जातो, अशी शीखांची श्रध्दा आहे. शहरात अंत्रोळीकर नगर येथे शीखांचे धर्मस्थळ 'गुरूद्वार' असून[२१३] गुरूद्वारामध्ये नियमित उपासनेखेरीज सुर्यसंक्रांत, शीख धर्मगुरूचे जन्मदिवस, गुरूपद प्राप्तीदिन, निर्वाणदिन तसेच शेटच्या गुरू गोविंदसिंगांचा बलिदान दिन उत्सव स्वरूपात साजरे केले जातात. कार्तिकी पोर्णिमा हा आद्य गुरू नानकांचा जन्मदिन म्हणजेच त्रिपुरारी पोर्णिमा हा दिवस शहरातील या गुरूद्वारामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जतो. या गुरूद्वाराची सर्व व्यवस्था सरदार रमेशसिंगजी पामनदास वातवानी, रविंद्र सिंगजी आणि प्रदीप सिंगजी तसेच कपिल नानकांनी पाहतात.[२१४] उत्तर भारतातून व पंजाबातून दक्षिण भारताकडे जाणारे शीख शहरातील या गुरूद्वारास भेट देतात. तसेच मालाची वाहतूक करणारे मालट्रक चालक-मालक या गुरूद्वारामध्ये आश्रयास असतात. त्यावेळी त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था सदर गुरूद्वारमार्फत केली जाते.

शीखांमध्ये मृत्यु संस्कार दहनाने होतो. मृत व्यक्तीजवळ बसून नातेवाईक 'ग्रंथसाहेब' मधील काही मंत्राचा उच्चार करतात. मृत्युनंतर आत्यंतिक शोक करण्याला शीखांमध्ये मनाई आहे. अंत्यसंस्कारावेळी विधी करताना मृत व्यक्तीच्या मुलास पांढरा फेटा बांधला जातो. मृत्युनंतर स्मारक उभारणे तसेच श्राध्द घालण्याची प्रथा शीख धर्मात नाही.[२१५]

अशाप्रकारे सोलापूर शहरात सर्व धर्म व पंथाचे अस्तित्व असून, प्रत्येक धर्माची स्वतंत्र आचारसंहिता तयार झालेली आहे. प्रत्येक धर्मसंप्रदायाचे दृष्टीकोन, श्रध्दा, मूलप्रणाली वेगवेगळी

असल्याचे दिसून येते. सामाजिक व धार्मिक जिवनात संत, महंत व साधू-सन्यासी यांना महत्व होते. त्यांच्या आचर-विचारांचा समाजमनावर पगडा होता. असे असले तरी या शहरातील विविध धर्मियामध्ये मोठ्या प्रमाणावर ऐक्य दिसून येते.

# संदर्भ व तळटिपा


१. पगडी सेतु माधवराव, महाराष्ट्र - कर्नाटकातील सुवर्णकाळ, १९९०, प्रस्तावना.

२. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १६९.

३. जोशी ज. वा., धर्माचे तत्त्वज्ञान, १९७५, पृ. १.

४. वर्तक प. वि., उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपन, भाग-२, १९९७, पृ. ४१८.

५. शिंदे वि. रा., धर्म जीवन व तत्त्वज्ञान, १७७९, पृ. ४२८, ४२९.

६. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. ११८.

७. जोशी महादेव शास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड-४, १९९४, पृ. ५६९.

८. शर्मा डि. एस., इसेन्स ऑफ हिंदुझम, १९७१, पृ. १.

९. http://www.marathivishwakosh.in, 3/10/2013,VOL.VIII.

१०. सहस्त्रबुध्दे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, १९९४, पृ. ६६३.

अ) सरदार गं. बा., महात्मा फुले व्यक्तितत्त्व आणि विचार, १९८२, पृ. ११०.

ब) कीर धनंजय, मालशे स. ग., फडके य. दि., (संपा), महात्मा फुले समग्र वाङ्मय, २००६, पृ. ५७०.

११. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, २०११, पृ. १९६, १९७.

१२. स्वामी विवेकानंद, भारताची अध्यात्मिक विचारधारा, २००६, पृ. ४.

१३. भगत रा. तु., (संपा.), संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ, २००४, पृ. ६९०.

१४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, पृ. २६, २७.

१५. गर्गे स.मा., (संपा.), भारतीय समाजविज्ञान कोश, खंड- ३, पृ. २७-२९.

अ) मेहंदळे य. श्री., समाजशास्त्राची मूलतत्त्वे, पृ. २७५, २७६.

१६. www.marathivishwakosh.in, VOL. VIII.

१७. भागवत दुर्गा, धर्म आणि लोकसाहित्य, १९५६, पृ. १.

१८. कर्वे इरावती, संस्कृती, २००६, पृ. ८९.

१९. सहस्त्रबुध्दे पु. ग., उपरोक्त, पृ. ३९८.

२०. काणे पा. वा., (अनु.), धर्मशास्त्राचा इतिहास, १९७०, पृ. १ - ३.

२१. पाठक प्रभाकर, राष्ट्र धर्माचे प्रणेते, २००७, पृ. ६.

२२. कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, २००१, पृ. ७ , ८.

२३. सोलापूरातील धार्मिक स्थळे

मल्लिकार्जून मंदिर, रेवणसिध्देश्वर, सिध्देश्वर, निलकंठेश्वर, शंकरलिंग देवस्थान, मार्कंडेय देवस्थान, व्यंकटेश देवस्थान, जुने विठ्ठल मंदिर, तुकाराम मंदिर, जुने दत्त मंदिर, राम मंदिर पूर्व भाग, रूपाभवानी देवी मंदिर, हिंगुलांबिकादेवी मंदिर, गद्रे लक्ष्मी, शुभराय मठ, बृहन्मठ होटगी, दंडवते गुहा, काळी मशिद, जामा मशिद, पानगल ईदगाह, शहाजहूरवली दर्गा, दिगंबर जैन मंदिर, आदेश्वर श्वेतांबर जैन मंदिर, अमेरिकन मराठी मिशन चर्च इत्यादी.

२४. जोशी तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री, सर्व धर्म समिक्षा, आवृत्ती पहिली, प्रज्ञा पाठशाळा, वाई, १९८४, पृ. १०९.

**हिंदु धर्माची लक्षणे -** हिंदु धर्माची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये (लक्षणे) दिसून येतात. विशिष्ट प्रकारच्या सामाजिक चालीरिती किंवा समाज रचनेचे विशिष्ट कायदे (जाती संस्था) हे महत्त्वाचे लक्षण असून वर्णसंस्था, जातीसंस्था, विशिष्ट तऱ्हेच्या विवाहादी संस्कार, देशजाती कुळ धर्म, वारसा हक्काचे नियम व एकत्र कुटुंब पध्दती हे त्यांचे घटक आहेत अथवा ही त्याची सामाजिक बाजू आहे.

दुसरे महत्त्वाचे लक्षण म्हणजे परस्परांविरोधी अनेक पारमार्थिक सांप्रदाय होय. हिंदु धर्मात अनेक पंथ, उपपंथ उदयास आले. वारकरी, महानुभव, दत्त, नाथ, समर्थ, वीरशैव आणि नागेश सांप्रदाय होत.

हिंदु धर्मातील प्रमुख सांप्रदाय हे शिव, विष्णु व शक्ती या देवतांना व त्यांच्या अवतारांना मानणारे होते. हिंदु धर्मातील विविध पंथ हिंदु धर्माच्या तत्त्वज्ञानाशी जोडलेले असले तरी हे पंथ आपापसात परस्परांवर टिका करतात. हिंदु धर्मात भक्तीला अत्यंत महत्त्व आहे, भक्ती हे महत्त्वाचे लक्षण आहे.

२५. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १६२-१७१.

२६. सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. १८८-१९९.

२७. सोलापूर दंगल चौकशी व कृती अहवाल, संजय सेठी (प्रका.), २००५ - ०६, पृ. २.

२८.	बहिरट, भालेराव, वारकरी सांप्रदायाचा उगम व विकास, पुणे, १९८८, पृ. १.

२९.	दैनिक सकाळ, सोलापूर, १७ जुलै २०१३.

३०.	भागवत दुर्गा, उपरोक्त, पृ. ३७.

३१.	गोसावी र. रा., पाच भक्तिसंप्रदाय, पुणे, २००८, पृ. १७४.

३२.	वैभवशाली वारकरी परंपरा, स्मरणिका, सोलापूर, २०१०, पृ. १७.

३३.	नाईक म. भि., धन्य ते संसारी, पृ. ७४.

३४.	वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. १३.

३५.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. ५.

३६.	राजवाडे, वि. का., नामादिशब्दत्यूत्पत्ती कोश, पृ. १८४.

३७.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. २.

३८.	Moles Worth Marathi English Dictionary, By Baba Padamanji, 1863, P. 394.

३९.	दांडेकर शं. वा., वारकरी संप्रदायाचा इतिहास, पृ. २.

४०.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १०८.

अ) नाईक, म. भि., उपरोक्त, पृ. ६४.

४१.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १०८.

४२.	देखणे रामचंद्र, वारी : स्वरूप आणि परंपरा, पुणे, २००७, पृ. ५४.

४३.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १४४.

४४.	देव सु. बा., इथे संताचिये नगरी, १९८८, पृ. ७-८.

४५.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १४५.

४६.	देखणे, उपरोक्त, पृ. १५१.

४७.	बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. १५१.

४८.	कित्ता, पृ. १४६-१४७.

४९.	निकम गौतम, संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह, २०१०, पृ. ७.

५०.	वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. ४-५.

**किर्तनकार -** सोलापूर शहरातील वारकरी सांप्रदायाच्या माध्यमातून अनेक किर्तनकार होऊन गेले. त्यामध्ये नाशिककर महाराज, बोळकवठेकर गुरूजी, बाजी आण्णा, थावरे द. का., तोडमे

गुरूजी, लक्ष्मण महाराज धोत्रे (वडार समाज), अनंत महाराज इंगळे, भाऊसाहेब शेळके, धोंडोपंत भोरवेकर, सिद्रामप्पा महाराज, जगन्नाथ पुजारी, रंगनाथ बोगा (पद्‌मशाली), दिगंबर महाराज कैकाडी समाज, सायण्णा आडकी, कृष्णप्पा महाराज, मल्लिकार्जून राऊत (रोहिदास समाज), निवृत्ती दादा लोंढे, सुधाकर इंगळे इत्यादींचा समावेश होतो.

५१. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. ७१-७३.

५२. जोशी महादेव शास्त्री, उपरोक्त खंड-४, पृ. ३५९-३६०.

५३. वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. ३-४.

५४. बहिरट, भालेराव, उपरोक्त, पृ. ३००-३०१.

५५. मुलाखत, ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज, अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी मंडळ सोलापूर.

५६. दैनिक सकाळ, सोलापूर, १२ फेब्रुवारी २०१३.

५७. मुलाखत, ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज.

५८. मुलाखत, सौदागर जगताप, विठ्ठल मंदिर, गवळी वस्ती, सोलापूर.

५९. वैभवशाली वारकरी परंपरा, पृ. ७०.

अ) दैनिक सकाळ, सोलापूर, १४ जुलै २०१३.

६०. नाईक म. भि., उपरोक्त, पृ. ५१-६२.

६१. थावरे द. का., जीवनगंगा, ब्रम्हलिंग ह. भ. प. श्री. लक्ष्मण महाराज धोत्रे, २०११,

६२. सोलापूर समाचार ज्युबिली अंक, १९३६, पृ. १५९.

६३. ईराबत्ती आशण्णा, माझ्या आयुष्यातील टिपणे, १९७१, टिपण नंबर ५२.

६४. दैनिक सकाळ, सोलापूर, ८ जून २००८.

६५. ईराबत्ती आशण्णा, उपरोक्त, टिपण नंबर ५२.

६६. मुलाखत, ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज.

अ) सबकुछ सोलापूर, पृ. १४१.

६७. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास, २००६, पृ. १६६.

६८. गोसावी र. रा., पाच भक्ती सांप्रदाय, १९७४, पृ. ३७७.

६९. घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, २०००, पृ. ६.

७०. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६७.

७१. नालवार जगदीश शास्त्री, वीरशैवांची स्थिती, १९४५, पृ. ४.

७२. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३७८.

अ) दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ३१ जुलै २०१३.

७३. शाबादे रेवण, करूणाघन महात्मा बसवेश्वर, २००९, पृ. ११९.

७४. पाटील एस. एच., कम्युनिटी डिमिनन्स् ॲण्ड पॉलिटिकल मॉडर्नायझेशन, २००२, पृ. ५.

७५. लिंगानंद स्वामीजी, अ ब्लेम ऑफ गॉड, १९७३, पृ. १४.

७६. शेंडे एस. आर., मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८९, पृ. ३४.

७७. निकम गौतम, उपरोक्त, पृ. ७.

७८. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ८४.

७९. रोडे सोमनाथ, सामाजिक क्रांतीचे जनक, महात्मा बसवेश्वर, पृ. १०.

८०. नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार (अनु.), व्यास नरेंद्र, २००८, पृ. १४२.

८१. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६९.

अ) निकम गौतम, उपरोक्त, पृ. ३६-३७.

८२. रोडे सोमनाथ, उपरोक्त, पृ. २२.

८३. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८६.

८४. लिगाडे जयदेवी, श्री. सिध्दरामाची त्रिविधी, १९५८, पृ. ७.

८५. फडकुले निर्मलकुमार, साहित्यातील सौंदर्य, पृ. १३८-१४०.

८६. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६.

८७. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८०.

८८. दासगुप्ता एस. एन., हिस्ट्री ऑफ इंडियन फिलॉसॉफी, १९५५, पृ. ५५.

८९. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. १.

९०. श्री सिध्देश्वर महात्म्य, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी सिध्देश्वर मंदिर, २००९, पृ. ७.

९१. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ३४५.

९२. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. ५-७.

९३. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४७.

९४. शाबादे रेवण, उपरोक्त, पृ. ६७-६८.

९५. पसारकर शे. दे. (संपा.), श्री. सिध्देश्वरांची वचने, खंड-१, २०१०, प्रस्तावना, पृ. १०-१३.

९६. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६-१६९.

९७. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४३.

९८. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, पृ. १२०.

९९. जोशी प्र. ना., लिंग पुराण, १८९२, पृ. १६५.

१००. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८२.

१०१. कित्ता.

१०२. चंद्रशेखर शिवाचार्य, वीरशैव अष्ठावरण विज्ञान, पृ. १.

१०३. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. १०.

१०४. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८१.

१०५. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २१२.

१०६. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८१.

१०७. शेणोलीकर, उपरोक्त, पृ. १६८.

१०८. शाबादे रेवण, उपरोक्त, पृ. ४१-५४.

१०९. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ३६-३७.

११०. रोडे सोमनाथ, उपरोक्त, पृ. २४.

१११. घुगरे सुर्यकांत , उपरोक्त, पृ. १७९-१८०.

११२. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६-१६८.

११३. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८२.

११४. ज्ञानप्रसाद, मासिक, कोल्हापूर, फेब्रुवारी १९७७, पृ. २.

११५. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २६२, २६३.

११६. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. १०-१५.

११७. मुगी सुललिता शंकर, विरदासोही, २००७, पृ. ९१.

११८. श्री वीरतपस्वी विशेषांक, श्री बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर, २००९ (संपा.), रोडगीकर रेवणसिध्द.

११९. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ३५०.

१२०. कित्ता, पृ. ३४७.

१२१. संशोधक, जून २००४, पृ. २१, आनंद कुंभार यांच्या लेखावरून.

१२२. सोलापूर समाचार, सोलापूर, ६ नोव्हेंबर १९५४.

१२३. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ११८-११९.

१२४. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १३७.

१२५. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६.

१२६. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४६.

१२७. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ८, ९.

१२८. देशमुख आप्पासाहेब, सोलापूर जिल्ह्यातील लिंगायत समाजाच्या संघटना, अप्रकाशित शोधप्रबंध (एम. फिल.), पुणे विद्यापीठ, पुणे, ऑगस्ट २००६, पृ. २२.

१२९. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. ११८-२३८ व १४२-१४३.

**आप्पासाहेब वारदांचे भाषण -** दिनांक २३ मे १९१० रोजी वीरशैव धर्म परिषदेचे पहिले अधिवेशन सातारा येथे घाटे यांच्या नाटकगृहात पार पडले. यावेळी आप्पासाहेब वारद हे या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. आपल्या स्वागताध्यक्ष पदाच्या भाषणात त्यांनी म्हटले होते की, "ईश्वर एक असला तरी आपण आपल्या गुणामुळे त्याची अनेक रूपे मानली आहेत. याकरीता धर्मा-धर्मात व भक्ता-भक्तात भिन्न देवतेमुळे द्वेष असण्याचे मुळीच कारण नाही. ज्याने त्याने आपले दैवत पुजावे, आपला धर्म पाळावा व दुसऱ्यासही तसेच करण्यास सांगावे व मित्रत्त्वाने वागावे"

१३०. बामणगांवकर ना. रा., उपरोक्त, पृ. २२६.

१३१. दैनिक संचार, सोलापूर, १७ नोव्हेंबर १९८५.

१३२. शेंडे एस. आर., उपरोक्त, पृ. ३८.

१३३. ढेरे रा. चि., दत्त सांप्रदायाचा इतिहास, १९५८, पृ. ११-१२.

१३४. श्री दत्त गुरूनाथ लहरी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, सोलापूर (संपा.), सुनिल शिणखेडे, पृ. २७.

१३५. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. २६९-२७०.

१३६. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १५४.

१३७. श्री दत्त गुरूनाथ लहरी, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, पृ. २, ३.

१३८. दंडवते महाराज चरित्र, दंडवते गुहा, सोलापूर, पृ. १-१४.

१३९. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. २६७-२६८.

१४०. सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रूती, पृ. १३०.

१४१. शेंडे एस. आर., उपरोक्त, पृ. १८.

१४२. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३५-३६.

१४३. जोशी प्र. ना., उपरोक्त, पृ. ११०.

अ) गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ४३.

ब) शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६५.

१४४. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ४०-४३.

१४५. जोशी प्र. ना., उपरोक्त, पृ. १४६-१४७.

१४६. मुलाखत, प्रकाश शंकर चव्हाण, पुजारी, काळभैरवनाथ मंदिर, तुळजापूर वेस, सोलापूर.

१४७. मुलाखत, श्री सुरेंद्रनाथ महाराज, इंचगिरी मठ, नेहरू नगर, सोलापूर.

**सोलापूर शहरातील इंचगिरी मठाच्या विविध शाखा -** जयप्पा महाराज मठ बाळे, सिध्दरामेश्वर मठ बाळे, प्रभाकर महाराज मठ सम्राट चौक, सेवालाल महाराज मठ सेटलमेंट इत्यादी मठांतून सोलापूर शहरात नाथ सांप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला जातो.

१४८. ढेरे रा. चि., प्राचीन मराठीच्या नवधारा, मोघे प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. ११६.

अ) गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३९१, ३९३.

१४९. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ४१-४२.

१५०. दिव्य कुराण, मराठी अनुवाद, निदान-ए-इस्लाम, मुंबई, २००२, पृ. ५.

अ) खेर संजिवनी, धर्म, पुणे, पृ. ४८.

१५१. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७९.

**इस्लामची आचार तत्त्वे** - कलमा पठण करणे, नमाज पढणे, रोजा पाळणे, जकात देणे, हज यात्रा करणे ही इस्लाम धर्मीयांची पाच आचार तत्त्वे आहेत.

**कलमा पठण करणे** : अल्ला आणि पैगंबर यांच्या नावाचे सातत्याने पठण करणे होय. 'लाइलह इल्ल, लह, मुहंमद-उर-रसूल 'ल्लह' या मंत्राचे पठण करणे म्हणजे कलमा होय.

**नमाज** : दररोज दिवसातून पाच वेळा ईश्वराची प्रार्थना करणे म्हणजे नमाज पढणे होय. आठवड्यातून एकदा तरी शुक्रवारचा नमाज मशिदीत पडावा अशी श्रध्दा इस्लाम धर्मीयांत आहे.

**रोजा** : इस्लाममध्ये सर्वात पवित्र महिना म्हणजे रमजान होय. रमजानच्या महिन्यात महिनाभर फक्त एकदाच सुर्यास्तानंतर भोजन केले जाते.

**जकात** : इस्लाम धर्मात सांगितल्याप्रमाणे दान-धर्म करणे, भिक्षा देणे, गरजूंना मदत करणे म्हणजे जकात होय. आपल्या वार्षिक उत्पन्नाचा चाळीसवा हिस्सा दान धर्मात खर्च करणे.

**हज** : मक्का हे जगातील इस्लाम धर्मीयांचे विशेष पवित्र स्थळ आहे. या ठिकाणी व्यक्तीने आयुष्यात एकदा तरी यात्रेला जावे, असे सांगितले आहे.

१५२. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. १८८-१९९.

१५३. कित्ता, पृ. ९९५-९९६.

१५४. कित्ता, पृ. १९५-२०३.

१५५. दैनिक सकाळ, सोलापूर, ६ एप्रिल २००१.

१५६. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७९.

१५७. कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, पृ. ८१-८२.

१५८. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७९.

१५९. कुलकर्णी पी. के., उपरोक्त, पृ. ८१-८२.

१६०. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १८०-१८२.

१६१. दैनिक सकाळ, सोलापूर, ६ एप्रिल २००१.

१६२. शहा सुमतीबाई, (संपा.), पुर्णाध्य, पृ. २.

**णमोकार मंत्र**

णमो अरिहंताणं
णमो सिध्दाणं
णमो आइरियाणं
णमो उवज्झायाणं
णमो लोए सव्वसाहूणं ।
एसो पंच णमोयारो सव्वपावप्पणासणो ।
मंगलाणं च सव्वेसि पढमं हवइ मंगल ।


१६३. जामखेडकर अ. प्र., महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ, खंड- १, भाग- २, स्थापत्य व कला (संपा.), डॉ. पाठक अ. श., २००९, पृ. ८५.

**पाले येथील जैन शिलालेख-** 'णमो अरिहंताणं' हा जैन शिलालेख पाले येथील लहान लेण्यात असून या शिलालेखाच्या अक्षराच्या धाटणीवरून हा शिलालेख ख्रि. पू. पहिल्या शतकातील असावा, असे मत डॉ. साकंलिया आणि डॉ. शोभना गोखले यांचे आहे. हा शिलालेख महाराष्ट्रातील जैन शिलालेखात सर्वाधिक प्राचीन असण्याची शक्यता आहे.

१६४. संगवे विलास, जैन कम्युनिटी, पृ. १०८-१३०.

१६५. सोलापूर समाचार, ज्युबिली अंक, १९३६, पृ. १६५.

१६६. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ५ एप्रिल २०१२.

१६७. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ४२.

१६८. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ११.

१६९. सोलापूर शहर जनगणना, २०११, तक्ता क्रमांक ११.७, पृ. १६३.

१७०. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २०३-२०७.

१७१. कित्ता, पृ. २०७.

१७२. सोलापूर समाचार, १२ ऑक्टोंबर १९१५.

१७३. कित्ता, २० डिसेंबर १९४६.

अ) सोलापूर समाचार, १३ फेब्रुवारी १९७४.

१७४. सोलापूर समाचार, १२ ऑक्टोंबर १९१५.

१७५. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २१५.

१७६. कित्ता.

१७७. शहा सुमतीबाई, पूर्णाघ्य, पृ. ६९८-७०७.

१७८. 'सल्लेखना' यादी, श्राविका, संस्थानगर, सोलापूर.

१७९. शहा सुमतीबाई, पूर्णाघ्य, पृ. ६९९.

स्वामी समंतभद्राचार्यांचा प्रसिध्द **सल्लेखना मंत्र**

मंत्र :- उपसर्गे दुर्भिक्षे जरसिरूजायां च निष्प्रतीकारे ।
धर्मायतनुविमोचनमाहू : सल्लेखनामार्या : ।।

अर्थ :- निष्प्रतिकार उपसर्ग आल्यावर दुर्भिक्ष पडल्यावर, वृध्दत्त्व आल्यावर आणि असाध्य रोग झाल्यावर धर्मार्थ शरीर सोडणे यास 'सल्लेखना' म्हणतात.

१८०. शहा वागदरीकर, जैन संस्कृती, पृ. २२४.

१८१. शास्त्री पंडीत वर्धमान, श्री आदिनाथ जैन मंदिर सोलापूर, शत-संवत्सरिक इतिहास, १९४९, पृ. ३४-३६.

१८२. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २०७.

१८३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिष्कृत भारत आणि मूकनायक महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृ. १५१-१५२.

१८४. कित्ता, पृ. २८७.

१८५. सोलापूर समाचार, ५ डिसेंबर १९३१.

१८६. सोलापूर समाचार, ११ मार्च १९३६.

१८७. पाठक प्रभाकर, राष्ट्र धर्माचे प्रणेते, पृ. ३१४.

१८८. सोलापूर समाचार, १३ मे १९३६.

अ) कित्ता, २६ मे १९३६.

१८९. कित्ता, २५ जुलै १९३६.

१९०. मुलाखत, प्रल्हाद जगन्नाथ चंदनशिवे (भिख्खु), बुध्दाचे दानमय बुध्द विहार, सोलापूर.

१९१. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १८८-१९१.

१९२. दैनिक लोकमत, सोलापूर, १३ ऑक्टोंबर २०१३.

१९३. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ४२.

१९४. जक्कल वि. न., उपरोक्त, पृ. ११.

१९५. दैनिक सकाळ, सोलापूर, १८ ऑगस्ट २०१२.

१९६. दैनिक संचार, सोलापूर, २० ऑगस्ट २०११.

१९७. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. ९९६.

१९८. भारतीय संस्कृती कोश, खंड-५, पृ. ५२६.

१९९. कित्ता, पृ. ५२९.

२००. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. १७२-१७४.

२०१. करंदीकर सु. द.(प्रकाशक),अमेरिकन मराठी मिशनची दिडशे वर्षे,(१८१३-१९६३) पृ.१५३.

२०२. सोलापूर समाचार, ज्युबिली अंक, पृ. १२१.

२०३. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २४२.

२०४. शतसंवात्सरिका ग्रंथ, पृ. ३७-४८.

२०५. सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, १९७७, पृ. २०३.

२०६. कित्ता, पृ. ९९६.

२०७. PWD, File No. 2877, 1922-23.

२०८. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. २०९.

२०९. मुलाखत, सरदार रमेश सिंगजी पामदास वातवणी, गुरूद्वार व्यवस्थापक, सोलापूर.

२१०. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १८ नोव्हेंबर २०१३.

२११. जोशी ज. वा., उपरोक्त, पृ. २२०.

२१२. कुलकर्णी पी. के., उपरोक्त, पृ. १११.

२१३. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ११६.

२१४. दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, १८ नोव्हेंबर २०१३.

२१५. मुलाखत, सरदार रमेश सिंगजी पामदास वातवणी, गुरूद्वार व्यवस्थापक, सोलापूर.

२१६. घुगरे सुर्यकांत, विरशैव व इतर धर्म आणि समाज, पृ. ११७.